
शनिवार, 20 ऑगस्ट 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 25
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 20 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-25 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## गोविंदा आला रे ...



ठाण्यात मनसेच्या दहीहंडीत कोकण नगर गोविंदा पथक जोगेश्वरी यांनी ९ थर लावले.

# मनीष सिसोदिया मुख्य आरोपी

## दिल्लीच्या मद्य धोरण घोटाळ्यात सीबीआयकडून एफआयआर दाखल

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली : दिल्लीमधील उत्पादन शुल्क धोरणातील कथित अनियमिततेच्या संदर्भात सीबीआयने उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या घरासहित २१ ठिकाणी छापेमारी केली आहे. जवळपास दहा तासांपासून सीबीआय सिसोदियांच्या घरी तपास करत आहे. दिल्लीतील मद्य धोरण घोटाळ्याविरोधात सीबीआयने मनीष सिसोदियांसोबत १५ आरोपींविरोधात एफआयआर दाखल केला आहे. यामध्ये सिसोदियांना घोटाळ्यातील मुख्य आरोपी सांगण्यात आले आहे.**

सिसोदिया यांनी गुन्हेगारी कट आणि खात्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोपही सीबीआयने त्यांच्यावर केला आहे. सीबीआयने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये काही दारु कंपन्यांचाही समावेश आहे. त्यासोबत १५ जणांविरोधात आणि काही अज्ञात लोकांविरोधात सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे. दिल्ली सरकारच्या एक्साईज पॉलिसीच्या विरोधात तपास करण्याची शिफारस नायब राज्यपालांनी केली होती.

**छापेमारीनंतर सिसोदियांचे ट्वीट**

सीबीआय आलेली असून त्यांचे स्वागत आहे. आम्ही ईमानदार आहोत. लाखो मुलांच्या भविष्य उभारणीचे काम आम्ही करत आहोत. जो चांगले काम करतो त्याला असाच त्रास दिला जातो. आपल्या देशाचे हे दुर्दैव आहे. याच कारणामुळे आपल देश प्रथम क्रमांकावर नाही, असे ट्वीट करत मनीष सिसोदिया यांनी या कारवाईचा निषेध केला आहे.

तसेच, सत्य लवकर समोर यावे म्हणून आम्ही सीबीआयला पूर्ण सहकार्य करू. माझ्यावर आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल करण्यात आले मात्र त्यातून काहीही निष्पन्न झालेले नाही. या कारवाईतूनही काहीही समोर येणार नाही. चांगले शिक्षण



देण्याच्या आमच्या प्रयत्नांना कोणीही रोखू शकत नाही, असेदेखील सिसोदिया म्हणाले.

### सिसोदियांवरील कारवाईवर केजरीवालांची टीका

सिसोदिया यांच्याविरोधातील या कारवाईवर अरविंद केजरीवाल यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे. दिल्लीमधील शिक्षण आणि आरोग्य सवेवर होत असलेल्या कामाची दखल जगभरात घेतली जात आहे. या कामाला यांना थांबवायचे आहे. याच कारणामुळे आरोग्य आणि शिक्षणमंत्र्यांच्या घरावर छापेमारी करण्यात येत आहे. ७५ वर्षातील सर्व चांगल्या कामांना थांबवण्याचे काम करण्यात येत आहे. याच कारणामुळे भारत पिछाडीवर आहे, अशी टीका केजरीवाल यांनी केली आहे.

# तीन महिन्यात आरोप निश्चित करण्याचे आदेश

## एल्गार परिषद प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने विशेष राष्ट्रीय तपास संस्थेच्या न्यायालयाला भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी व्हर्नन गोन्साल्विसवरील आरोप तीन महिन्यांत निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत. एल्गार परिषद प्रकरणातील देशविरोधी कारवाया केल्याचा आरोप असलेल्या कार्यकर्त्यांविरुद्धचा खटला पुढे सरकत नसून आरोपी गेल्या चार वर्षांपासून कोठडीत आहेत, याकडे शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले आहे. ट्रायल कोर्टाला एकाच वेळी आरोप निश्चित करण्यासाठी आणि खटल्यातील दोषमुक्तीची मागणी करणाऱ्या आरोपींच्या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तीन महिन्यांची मुदत दिली आहे. न्यायमूर्ती यूयू ललित आणि न्यायमूर्ती रवींद्र भट यांच्या खंडपीठाने या प्रकरणातील आरोपी गोन्साल्विसच्या जामीन अर्जावर फेरविचार करताना हे निर्देश दिले. एनआयएला १५ प्रकरणांची सुनावणी वेगळी करण्यासाठी पावले उचलण्यास यावेळी सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. ट्रायल कोर्टासमोर योग्य अर्ज दाखल करून उर्वरित आरोपींना अटक करा आणि इतर चार आरोपींनाही घोषित गुन्हेगार म्हणून घोषित करा, असंही यावेळी न्यायालयाने नमूद केलं आहे.

दरम्यान व्हर्नन गोन्साल्विस यांना २८ ऑगस्ट २०१८मध्ये अटक करण्यात आली होती. तेव्हापासून ते कोठडीत आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने गोन्साल्विसला जामीन देण्यास नकार देणाऱ्या आदेशावर आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी सुरु असताना सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला आहे. NIA ला फरार आरोपींना फरारी गुन्हेगार नोटीस बजावण्याच्या सूचना खंडपीठाने केल्या. सुप्रीम कोर्टाने गोन्साल्विस यांच्या जामीन अर्जावर तीन महिन्यांनी सुनावणी घेण्यास सांगितले आहे.

कोरेगाव भीमा लढाईच्या २०० व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला ३१ डिसेंबर २०१७ रोजी पुण्यात झालेल्या कार्यक्रमात केलेल्या भाषणांमुळे दुसऱ्या दिवशी हिंसाचार झाला. बंदी घातलेल्या सीपीआय (माओवादी) ने एल्गार परिषदेला पाठिंबा दिला आणि निधी दिला, असे पोलिसांचे म्हणणे आहे. कोरेगाव भीमा येथे झालेल्या हिंसाचाराचा वेगळा तपास सुरू आहे ज्यात एकाचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले.

एल्गार परिषद प्रकरणात अटक करण्यात आलेल्या १६ आरोपींपैकी एक आदिवासी हक्क कार्यकर्ते फादर स्टॅन स्वामी यांचा कोठडीत मृत्यू झाला होता. व अन्य दोन आरोपी सुधा भारद्वाज आणि तेलुगू कवी वरावरा राव - यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. भारद्वाज यांना डिफॉल्ट जामीन मंजूर झाला होता, तर राव यांना वैद्यकीय कारणास्तव जामीन देण्यात आला आहे.

# राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** बंगालच्या उपसागरामध्ये निर्माण झालेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे देशाच्या अनेक भागांत पाऊस सक्रिय होणार आहे. राज्यातही पुढील तीन दिवस मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. राज्यात प्रामुख्याने कोकण, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे.

मोसमी पावसाची आस असलेला कमी दाबाचा पट्टा आणि समुद्रातून येणाऱ्या बाष्पामुळे राज्यात ऑगस्टच्या पंधरवड्यापर्यंत बहुतांश भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि दक्षिण कोकणात काही भागांत मुसळधार पाऊस झाला आहे.

सध्या राज्यात हलका पाऊस होत असला, तरी पुढील तीन दिवसांत काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचे तीव्र क्षेत्र निर्माण झाले आहे. ते उत्तर-पश्चिम दिशेने पुढे सरकत आहे. पश्चिम बंगाल आणि ओडिसाच्या किनारपट्टीवर ते धडकणार आहे. परिणामी या दोन्ही राज्यांसह तेलंगना, छत्तीसगड, सिक्कीम, पूर्व-मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रावर त्याचा परिणाम होणार आहे. या राज्यांमध्ये तुरळक ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# देशी दारु दुकानाला अनाड गावकऱ्यांचा कडाडून विरोध

## महिलांची आंदोलनासाठी आक्रमक भूमिका

आधुनिक केसरी न्यूज

संदीप मानकर

अजिंठा : गावातील शासनमान्य असलेले देशी दारुचे दुकान हे अनाड-अजिंठा रोडवरील शिवटेकडी जवळ स्थलांतरित होत आहे. या देशी दारु दुकानाला अनाड ग्रामस्थांचा कडाडून विरोध होत असून सदरील दुकानाचे या रोडवर स्थलांतर झाल्यास लोकशाही मार्गाने लक्षवेधी आंदोलने केले जातील आणि वेळप्रसंगी आत्मदहन केले जाईल असा इशारा अनाड गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे की, सदरील देशी दारुच्या स्थलांतरणाला अजिंठा ग्रामपंचायतच्या वतीने परवानगी देण्यात आली आहे. मात्र ज्याठिकाणी हे दुकान थाटत आहे तो अनाड ते अजिंठा गांवचा मुख्य रस्ता आहे शिवाय या रस्त्यांवरुनच अजिंठा गांवाला जाता येते म्हणून अजिंठा बाजारपेठ असल्याने मोठ्या संख्येने महिला बाजारात व खरेदीसाठी जात असतात. यांसोबतच ज्याठिकाणी या देशी दारु दुकानाचे स्थलांतरण होत आहे त्याला लागूनच महात्मा ज्योतिबा फुलेविद्यालय व बाबुरावजी काळे महाविद्यालयात शाळकरी मुले व मुली ये-जा करीत असतात म्हणून हे दुकान याठिकाणी थाटल्यास मुला-मुलींचे शैक्षणिक नुकसान होऊन मद्यपी लोकांच्या चुकीच्या नजरा




शालेय मुलींवरती जातील व अनाड गावांतील तरुणांमध्ये व्यसनाधीनता वाढेल आणि त्यांचे संसार उध्वस्त होतील. म्हणून अनाड ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने गावकऱ्यांची बैठक घेऊन एकमुखाने या दुकानाच्या स्थलांतरणाला विरोध करण्यात आला असून जर विरोधानंतर देखील सदरील दुकान थाटल्यास गावांतील महिलांनी कंबर कसली आहे व आक्रमक आंदोलनाचा पावित्रा घेतला आहे. याप्रसंगी ग्रामसेवक सुनील पाटील, सरपंच रामकोरबाई बिरारे, उपसरपंच प्रविण जाधव, ग्रा.पं.सदस्य गजानन गदाई, ग्रा.पं.सदस्य भागवत शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष हरिभाऊ पवार, माजी सरपंच आत्माराम मुके, सुभाष पवार आदींसहित शाळकरी मुला-मुलींची व गावांतील ग्रामस्थ तथा महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**आम्ही राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने आलो असून तुम्हा गावकऱ्यांचे जे म्हणणे आहे ते रीतसर आम्ही आमच्या विभागातील वरिष्ठांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करु व सदरील निर्णय वरिष्ठ घेतील.**

**एस.एस.पाटील, दुय्यम निरीक्षक,**
**राज्य उत्पादन शुल्क क्रं.2 सिल्लोड विभाग**

**आम्ही ग्रामपंचायत कार्यालय व अनाड गावकऱ्यांच्या वतीने या देशी दारु दुकानाच्या स्थलांतरणाला विरोध करीत असून सदरील दुकान उभे राहिल्यास गांवचे व शालेय मुला-मुलींचे शैक्षणिक नुकसान होऊन गांव मागासलेपणाकडे वाटचाल करेल म्हणून आपण या दुकानाचे स्थलांतरण थांबवावे अन्यथा आम्हांला लोकशाही मार्गाने आक्रमक आंदोलन छेडावे लागेल.**

**प्रवीण जाधव, उपसरपंच,**
**ग्रामपंचायत कार्यालय अनाड**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ‘ ये राखी बंधन है ऐसा ...

आधुनिक केसरी

मंडळी, सध्या ONLINE चा जमाना आहे. प्रत्येक गोष्ट ONLINE मागवता येते. आज नवीन वाटणाऱ्या गोष्टी उद्या जुन्या होतात. पण काही गोष्टी या चिरंतन टिकून राहतील त्यातीलच एक म्हणजे रक्षाबंधनाची परंपरा. अगदी बारीकसारीक गोष्टीही ऑनलाईन मागवणारी मंडळी आहेत. तशीच ते राखीही ऑनलाईन मागवू शकतील. पण त्यामागील बहिणीचे प्रेम नाही मागवता येणार. ‘ ये राखी बंधन है ऐसा...’ राखी म्हणजे तसा दिसायला एक रेशमी धागा. पण त्यामागची भावना किती श्रेष्ठ ! राखी म्हणजे रक्षण. राखीचा पवित्र धागा अशा काही बंधनात



बांधतो की हे बंधन दिसत नाही. राखी भलेही तुटेल पण त्यामागची भावना, प्रेम अबाधित राहते. एक अदृश्य बंधन भावाबहिणींना बांधून ठेवते.

वर्षाच्या ३६५ दिवसातले ३६३ दिवस तुमचे पण दोन दिवस बहिणीचे. एक राखी पौर्णिमा आणि दुसरा भाऊबीज. भाऊ आणि बहिण यांचे नाते सगळ्या सीमारेषा पार करून जाते. जाती, धर्म, भाषा, प्रदेश या सर्वांना ओलांडून ते जाणारे आहे. विश्वबंधुत्वाची शिकवण देणारा हा सण आहे. बहिण आपल्या संसारात रमलेली असते. तिचे एक नवीन विश्व तयार झालेले असते. त्या विश्वात ती वर्षभर गर्क असते. मुलेबाळे, संसार, नातेवाईक आदी साऱ्या साऱ्या जबाबदाऱ्या निभावत असते. पण रक्षाबंधन आणि भाऊबीज या दोन दिवशी तिचे डोळे लागलेले असतात फक्त आपल्या भावाकडे. तो कधी येतो, आपण त्याला कधी ओवाळतो आणि राखी बांधतो, त्याला मिठाईचा घास भरवतो असे तिला होते. त्या दिवशी तिला दुसरे काही नको असते. वर्षभरातून भावाने एकदा तरी आपल्यासाठी एकदा तरी वेळ काढावा एवढीच तिची माफक अपेक्षा असते. परक्या घरी आल्याने आईवडील तिला तसे दुरावलेले असतात. भावाने आपल्या आईवडिलांची नीट काळजी घ्यावी. त्यांना काही कमी पडू देऊ नये असे तिला वाटत असते. आणि संकटकाळी, सुखदुःखाच्या प्रसंगी भावाने आपल्या मदतीसाठी धावून यावे. आपले रक्षण करावे असेही तिला वाटत असते. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### विवेकी विचारांना महत्त्व अधिक

आधुनिक केसरी

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने एकूणच जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या कार्यकृतीत इतका विचार केलेला नसतो, हेही तितकेच खरे. आपल्या अंतर्मनांत जीवनासाठी अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. ह्यात सकारात्मक आणि विवेकी विचारांना अधिक महत्व असते. त्यासाठी आपल्या जिव्हाळ्याचे, हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. ते घर कितीही छोटे असले तरीही फरक पडत नाही, पण आपले मन मात्र मोठेच असायला लागते. अर्थात, घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. आपल्या जीवनाच्या समृद्धीसाठी आयुष्याची सुरुवातच घरामध्ये सकारात्मक विचारांनी करायची असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आजवर मनावर अनेकप्रकारे अनेकांनी भाष्य केले आहे. संतांनी देखील जगाला एकच गोष्ट सांगितली, ती म्हणजे मनाचे स्वास्थ्य टिकवा. ह्याचा अर्थ शरीराकडे दुर्लक्ष करा, असे अजिबात नाही. परंतू मन दिसत नसल्यामुळे त्याचा विचार आपल्याकडून कमी होत असतो. शरीर मात्र दिसत असते, त्यामुळेच ते सदैव सुंदर ठेवले जात असते. शरीराचीच काळजी अधिक घेतली जाते. शरीराला पौष्टिक खाद्य देण्यातही आपण कधी मागे हटत नाही, खर्चाचा तर अजिबातच विचार करत नाही. शारीरिक तंदुरुस्तीसाठी खरे म्हणजे मानसिक स्वास्थ्यच अधिक महत्वाचे आणि मोलाचे असते.



आधुनिक केसरी

### कृपा भगवंत | सदा करी ||

नको होऊ मना | स्तुतीचा गुलाम ||
मृगजळी ठाम | घात होई ||१||

गुणवंता ठायी |संयम असावा ||
लाभार्थी नसावा | दृष्टीकोन ||२||

व्यासंगाचे फळ | कष्टाने लाभते ||
त्यासाठी लागते | अधिष्ठान ||३||

गुणाची पारख | प्रसंगाने होते ||
लाचारी भोवते | सर्वनाशा ||४||

आदरे भजावा | गुरू ज्ञानवंत ||
कृपा भगवंत | सदा करी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी


विश्वामरेन्द्रपदविभ्रमदानदक्षम्
आनन्दहेतुरधिकं मुरविद्विषोऽपि ।
ईषन्निषीदतु मयिक्षणमीक्षणार्ध
मिन्दीवरोदरसहोदरमिन्दिरायाः ॥३॥

जी सर्व देवतांचे अधिपती इंद्राच्या पदाचे ऐश्वर्य देण्यास समर्थ आहे, मुरारी श्रीहरींना अधिकाधिक आनंद प्रदान करणारी आहे, जी नीलकमळाच्या अंतरंगाप्रमाणे शोभायमान आहे, त्या लक्ष्मीच्या अर्धोन्मीलित नयनांची दृष्टी क्षणभरासाठी माझ्यावरही थोडीशी पडावी.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



### सगुणभजन

आधुनिक केसरी

विश्वामध्ये माया आणि ब्रम्ह, किंवा आत्मा आणि अनात्मा अशा दोन वस्तु आहेत. अनात्मवस्तु द्रुश्य,स्थुल अनेक, विनाशी,विकारी आहेत. ऊदा, आपला देह ,आत्मवस्तु न दिसणारी,सुक्ष्म,एकचंएक,अविनाशी अविकाल आहे. ऊदा आपला आत्मा किंवा स्वस्वरूप यामुळे मानवी जीवनाच्या दोन पातळ्या आढळतात. पहिल्या पातळीवर असलेला माणूस द्रयुश्य आणि देह संपूर्ण मानतो. त्याला आत्मा असुन नसल्या सारखा वाटतो. तर दुसऱ्या पातळीवर असलेला माणूस एकचं एक आत्मा संपूर्ण सत्य मानतो.त याला द्रयुश्य विश्व व स्वतः चा देह असुन नसल्या सारखा वाटतो. जीवनाच्या पहिल्या पातळीवरून दुसऱ्या पातळीवर जाणे म्हणजेच "परमार्थ"होय. ब्रम्ह आत्मस्वरूप असल्याने स्वतः मधील आत्मवस्तुची ओळख झाली की विश्वात व्यापून उरलेल्या ब्रम्ह स्वरूपाची ओळख होते. आत्म्याची ओळख होण्यासाठी अनात्म भाग बाजूला ठेवून दिला पाहिजे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

"देहचं मी आहे"अशी देहबुध्दीचा विवेक जागा झाला की हा आपला अनात्म भाग व देहबुध्दीचा विवेक होय.आपला देह खरा आपला देव खरा अशी भावना ठेवून श्रध्येने व प्रेमाने सगुणोपासना केली तर देहबुध्दी आपोआप क्षीण होत जाते.भगवंताचीसेवा करत असताना आपल्याला मीपणाचा व देहाचा विसर पडू लागतो. अशा रितीने भगवंताचे व त्यांच्या सगुणरूपाचे सतत चिंतन होत गेले की दिव्य प्रेम मनापासून निर्माण होते. निरंतर चिंतनाने त्याचे अखंड ध्यान लागते. ध्यानाची पराकाष्ठा झाली की प्रत्यक्ष परमात्मा दिसु लागतो.त्याच्या विषयी प्रेम निर्माण होते. या भगवंत भक्तित संपूर्ण आत्मनिवेदन घडून भगवंताचा साक्षात्कार होतो. समर्थानी यालाचं "भक्तिमार्ग"असे नाव दिले आहे. **(क्रमशः)**

## श्रीयाळ षष्ठी

आधुनिक केसरी

श्रावण शुद्ध षष्टी ही श्रीयाळ षष्टी म्हणून ओळखली जाते, महाराष्ट्र व कर्नाटकात या दिवशी श्रीयाळ शेठचा शेणामातीचा राजवाडा व त्याची प्रतिमा स्थापन करून साडेतीन घटकेनंतर त्याचे विसर्जन केले जाते. ईस १३९६ ते १४०८ चे दरम्यान महाराष्ट्र व कर्नाटक चे परिसरात मोठा दुष्काळ पडला होता, हा दुष्काळ ‘दुर्गादेवीचा दुष्काळ’ म्हणून ओळखला जातो. या वेळी या परिसरावर बिदरचा बादशहा राज्य करीत होता. सुमारे बारा वर्ष पुरसा पाऊस पडला नाही. हजारो लोक घरदार सोडून चालले होते, लहान मुले, वृद्ध, गुरे मृत्यूमुखी पडत होती. सगळी कडे हाहाकार माजला होता आणि बादशहा आपल्या विलासात मग्न होता.

या काळी श्रीयाळ शेठचा व्यापार देशभर चालत असे. धन संपत्ती व धान्याने त्याची कोठारे भरलेली होती. सभोवतालची परस्थिती पाहून श्रीयाळ शेट गहिवरला. त्याने लमाणांचे तांडे बाहेर पाठविले व दुसऱ्या भागातून धान्य चारा खरेदी करून आणला व दवंडी पिटून तो लोकांना मोफत अन्न धान्य वाटू लागला. संकट काळी मदतीला धावलेल्या



श्रीयाळ शेटचा लोक जयजयकार करू लागले. लोक अपबृहुशाने श्रीयाळ शेटला शिराळशेट म्हणू लागले, आपल्या राज्यात लोक दुसऱ्याचा जयजयकार करत असल्याचे बादशाहाला समजले त्याने श्रीयाळ शेटला बंदी बनवून दरबारात आणले. बादशहाने त्याला या कृत्याचा जाब विचारला. श्रीयाळ शेठने नम्रपणे आपण जे करायला हवे ते मी केले तर चुक झाली का? असे विचारले. सगळा दरबार स्तब्ध झाला. बादशाहाला आपली चुक समजली व त्याने आपली भूमिका बदलून मी तुझा सन्मान करू इच्छितो तुला क्या हवे ते माग असे शेटला सांगितले. मला आता मागण्यासाठी काहीही नाही, पण आपल्यासारखे राजे होण्याची सिहासनावर बसण्याची माझी इच्छा आहे. बादशहाने त्याला सिहासनावर बसविण्याची तयारी दर्शविली पण फक्त साडेतीन घटकेसाठी. शेटने या साडेतीन घटकेत मी घेतलेले निर्णय पुन्हा फिरविणार नाही याचे वचन बादशहाकडून घेतले व श्रीयाळ शेट राजा झाला. सिहासनावर बसताच त्याने राज्यातील धान्य कोठारे लोकांसाठी खुली केली, गावोगाव विहिरी खोदा, तलाव बांधा, धर्मशाळा बांधा, असे हुकुम दिले, जनतेला अन्न धान्य देऊन त्यांचाच गावात त्यांचेचसाठी कामे सुरु केली, प्रजा सुखी करणारे लोकाभिमुख निर्णय साडेतीन घटकेत घेऊन त्याने प्रजा सुखी करण्याचे निर्णय घेतले. श्रीयाळ शेठ सिहासनावर बसले व त्यांनी हे हुकुम दिले तो दिवस श्रावण शुद्ध षष्टीचा होता. म्हणून या दानशूर व्यापारी व साडेतीन घटकेचा लोककल्याणकारी राजाचे या राज्य कारभाराची स्मृती म्हणून हा श्रीयाळ षष्टीचा उत्सव साजरा केला जातो. ही स्मृती वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते.

इतरत्र कुठेही भरत नाही असा अद्वितीय शिराळ सेठचा बाजार आज श्रावण शु ६ रोजी छल्ला भागात भरत असतो. आपल्या पैकी 40 पेक्षा अधिक वयाच्या सर्वानी याचा आनंद घेतला असेल. त्याकाळी फार अत्यल्प किमतीत तिथूनच शिट्या, फुगे, खेळणी, गॉगल इ तसेच चिवडा ( फेमस ) इ गोष्टी 5 रु मध्ये मिळत असत. आपण किमान पुढील पिढीस इतिहास तरी सांगू शकतो किंवा अनुभवही देता, घेता येईल. आदिनाथचा चिवडा, दगडू वट्टमवारच्या कलमा, लाकडी घोड्यावरची गिरकी, प्लास्टिक पोंगा ती मज्जा काही औरच होती. खरंय पण याबाबतीत शिराळ सेठ म्हणजे खूप कमी वेळ राज्य उपभोगलेला राजा, अशी काहीशी दंतकथा ऐकिवात होती, म्हणूनच फक्त शिराळ असेपर्यंतच बाजार सुरू असे व पाऊस येताच तो गुंडाळला जाई... जुनी मंडळी याबद्दल जास्त सांगू शकतील. घड्याळ, चष्मा, चप्पल, चिवडा,अरे आपण खूपच नशीबवान आहोत, छोट्या छोट्या गोष्टीत आनंद मिळाला, खूप मजा येत असे, परत एकदा आठवणीतून अनुभवू या.

# ऑनलाइन पत्रकारितेमुळे माध्यमांचे लोकशाहीकरण पण विकृतीकरणाचे आव्हान

## स्व. मोहनलाल बियाणी व्याख्यानमालेत ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील यांचे प्रतिपादन






आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ऑनलाइन पत्रकारितेमुळे माध्यम जगत उत्क्रांतीच्या टप्प्यावर आहे. या उत्क्रांतीच्या प्रक्रियेमुळे बदलणाऱ्या वातावरणाशी जे जुळवून घेतील, तेच टिकतील. अन्यथा डायनासोरच्या वाटेने जातील, असा इशारा न्यूजटाऊनचे मुख्य संपादक सुरेश पाटील यांनी दिला. ऑनलाइन पत्रकारितेमुळे माध्यमांचे लोकशाहीकरण झाले हे खरे असले तरी फेकन्यूजमुळे त्याच माध्यमाचे विकृतीकरण होण्याचाही धोका आहे, हे आव्हान आपण कसे पेलणार?, यावरच या माध्यमाचे भवितव्य अवलंबून असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेतून दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलाल बियाणी यांच्या स्मरणार्थ मासिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. या व्याख्यानमालेत 'ऑनलाइन पत्रकारितेसमोरील आव्हाने' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी सुरुवातीला स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच सुरेश पाटील यांचा सत्कार मराठवाडा साथीचे संपादक जगदीश बियाणी यांनी केला.

पुढे बोलताना सुरेश पाटील म्हणाले की, १९९३ मध्ये फ्लोरिडा विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या प्रारंभिक न्यूज पोर्टलच्या रुपाने ऑनलाइन पत्रकारितेची बिजे रोवली. गेल्या २८-३० वर्षात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या सातत्यपूर्ण बदलांनी ऑनलाइन पत्रकारितेची धाटणी, स्वरुप, प्रक्रिया बदलली. त्यामुळे माध्यम जगत उत्क्रांतीच्या टप्प्यावर येऊन पोहचले आहे. उत्क्रांत होणे आणि नामशेष होणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. कोणत्याही उत्क्रांतीमध्ये अनेक विद्यमान प्रजाती नामशेष होतात. काही प्रजाती म्यूटेट होऊन नव्या स्वरुपात आपले अस्तित्व निर्माण करतात तर काही नव्या प्रजाती जन्माला येतात. तसेच काहीसे माध्यम जगतातही घडू पहात आहे, असे पाटील म्हणाले.

डायनासोरचे नाहीसे होणे हे उत्क्रांतीमध्ये नामशेष होण्याचे पृथ्वीवरील प्रसिद्ध उदाहरण आहे. १६० दशलक्ष अधिराज्य गाजवणारी डायनासोरची प्रजाती ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीवरून नामशेष झाली. पृथ्वीवर एक लघुग्रह कोसळला आणि त्यामुळे बदललेल्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी मेंदू आणि मेंदूची कार्ये विकसित करण्यात डायनासोर अपयशी ठरला. आव्हानात्मक परिस्थितीत टिकून राहण्याचा त्याच्यावर एवढा दबाव वाढला की तो सहन न होऊन डायनासोर आकुंचन पावले आणि नामशेष झाले. बदलत्या परिस्थितीशी ज्याला जुळवून घेणे जमते तेच एक तर जुन्या स्वरुपात तग धरून राहतात किंवा म्यूटेट होऊन नव्या स्वरुपात अस्तित्व निर्माण करतात. पण ज्यांना या बदलांशी जुळवून घेणे जमत नाही, त्यांचे नामशेष होणे क्रमप्राप्त आहे, असे पाटील म्हणाले.

डायनासोरच्या बाबतीत जे घडले तेच मीडियातील अनेक प्रजातींच्या बाबतीत घडते की काय? अशी शक्यता दिसू लागली आहे.

पारंपरिक पत्रकारिता विशेषतः प्रिंट मीडियाने तब्बल ३०० वर्षे जगावर अधिराज्य गाजवले आहे. मात्र ऑनलाइन पत्रकारितेने प्रिंट मीडियासमोर अनेक आव्हाने आणि धोके निर्माण केले आहेत. या बदलत्या वातावरणाशी जुळवून घेऊन नवीन कार्य पद्धती विकसित करण्यात प्रिंट मीडियाला अनेक अडचणी येत आहेत. एकीकडे नफ्यात झालेली घट आणि दुसरीकडे स्पर्धात्मक वातावरण अशा दुहेरी तणावाचा सामना पारंपरिक पत्रकारितेला करावा लागत आहे. त्यामुळे पारंपरिक मीडिया टिकेल की डायनासोरच्या मार्गाने जाईल?, हा खरा प्रश्न आहे, असे पाटील म्हणाले.

ऑनलाइन पत्रकारिता हा माध्यमांच्या लोकशाहीकरणाचा धाडसी प्रयत्न आहे. परंतु ऑनलाइन पत्रकारितेच्या ग्राहकांचे अलगोरिदमच्या माध्यमातून वर्गीकरण केले जाऊ लागले आहे. यूजर जे सर्च करतात, तेच त्यांना दाखवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे अनेक महत्वाच्या बातम्या तुम्हाला दाखवल्याच जात नाहीत. अलगोरिदम ही तांत्रिक क्रांती असली तरी त्यामुळे माहिती वंचितांचा एक मोठा वर्ग निर्माण केला जात आहे. हे एक मोठे आव्हान आहे. ऑनलाइन पत्रकारितेच्या दुनियेकडे लोकशाही दुनिया म्हणून पाहिले जात आहे. परंतु सामूहिक कृती घडली तरच लोकशाहीची प्रक्रिया घडते. त्यामुळे ऑनलाइन पत्रकारितेत किमान मुद्यांवर तरी कलेक्टिव्ह न्यूज कंझम्पशन होणे आवश्यक आहे, असे पाटील म्हणाले.

फेक न्यूजची विकृती ऑनलाइन पत्रकारितेमध्ये वेगाने फोफावू लागली आहे. क्लिक बॉरमुळे सनसनाटी निर्माण करणाऱ्या बातम्या पोस्ट करण्याकडे कल वाढताना दिसू लागला आहे. भारतातील ५७ टक्के लोकांना त्यांच्याकडे ऑनलाइन माध्यमातून आलेली बातमी खरी आहे की खोटी याची चिंता सतावते आहे. फेक न्यूज हा ऑनलाइन पत्रकारितेच्या सुवर्णकाळाकडील वाटचालीतील मोठा अडथळा असून तो दूर कसा करायचा यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. तसे झाले नाही तर हे गतीचक्र उलटे फिरण्याचा धोका आहे, असेही शेवटी सुरेश पाटील म्हणाले.

यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, संघटक विलास शिंगी, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, महानगर प्रमुख अनिल सावंत, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, उपाध्यक्ष छबुराव ताके, आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, मराठवाडा साथीचे युनिट हेड विलास जैन, प्रसिद्धी प्रमुख प्रशांत सुर्यतळे, पत्रकार जितेंद्र भवरे, शोएब दौलताबादे, सचिन उबाळे, अनिल कुलथे आदींची उपस्थिती होती.

### नवीन कार्यपद्धती विकसित करावी लागेल

**या बदलत्या वातावरणात प्रिंट मीडिया विशेषतः वृत्तपत्रे आज आहेत त्या स्वरुपात कायम राहू शकत नाहीत, हे स्पष्ट आहे. त्यांना आपली नवीन कार्य पद्धती विकसित करावी लागेल. तसे काही संकेतही मिळत आहेत. पत्रकारिता बदलत आहे. नवीन गुणधर्म आणि वैशिष्ट्ये स्वीकारू लागली आहे. आपल्या बलस्थानांचा विस्तार करू लागली आहे. वस्तुनिष्ठ वार्तांकन, माहितीपूर्ण विश्लेषण आणि मत व टिप्पणी हे पत्रकारितेचे मुख्य गुणधर्म आणि वैशिष्ट्ये तिने आपल्या वारसाकडे म्हणजेच ऑनलाइन पत्रकारितेला प्रदान केली आहेत. ही गुणधर्म आणि वैशिष्ट्येच ऑनलाइन पत्रकारितेचा मूलाधार बनली आहेत. त्यामुळे ऑनलाइन मीडिया हाच आता मेनस्ट्रीम मीडिया बनू पहात आहे, असेही पाटील म्हणाले.**

# काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह; 'व्हाईट टायगर' आपच्या वाटेवर

आधुनिक केसरी न्यूज



**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** सध्या सर्वत्र स्थानिक स्वराज्य निवडणुकीचे वारे वाहत असताना काही महिन्यापूर्वी यवतमाळ येथील तसेच संपूर्ण विदर्भात व्हाईट टायगर म्हणून परिचित असलेले भाई अमन यांनी पत्रकार परिषद घेऊन विधानसभेची निवडणूक लढणार असे जाहीर केले होते. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका सुद्धा भाई अमन स्वतंत्र आघाडी करून लढणार असल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे. याच अनुषंगाने भाई अमन येणाऱ्या काळात आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांचे नेतृत्वामध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. भाई अमन हे कट्टर काँग्रेसचे असून सध्या काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह सुरू असल्याने ते नाराज असल्याचे बोलल्या जात आहे. या कारणाने ते काँग्रेस सोडून आम आदमी पार्टीच्या वाटेवर असल्याचे बोलल्या जात असून दि. 20 तारखेला दिल्ली येथे अरविंद केजरीवाल यांचे नेतृत्वामध्ये जाहीर प्रवेश करणार असल्याचेही बोलल्या जात आहे. सध्या जनता वाढती महागाई, बेरोजगारी, सर्वसामान्यांचे प्रश्न, गरिबांचे प्रश्न याकडे सर्वच राजकीय पक्ष दुर्लक्ष करत असून मूळ प्रश्नांकडे डोळेझाक केल्या जात असल्याने यांना पर्याय म्हणून जनता आम आदमी पार्टीकडे पाहत आहे. दिल्ली व पंजाब मधील सत्ता परिवर्तनाचे वारे पाहता महाराष्ट्रातही परिवर्तन होईल असा विश्वास सर्वसामान्य नागरिकांना दिसत आहे. यामुळे निष्ठावंत पक्षावर अवलंबून असलेले मतदार आता वेगळा पर्याय निवडणार असे दिसत आहे.



# ममदापूर पाटोदा येथील युवक घरच्या तयारीने भारतीय नौदलात दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** अंबाजोगाईपासून अगदी जवळच असलेल्या ममदापूर पाटोदा येथील अगदी साधारण शेतकरी कुटुंबातील असणारा युवक शुभम विष्णु उगले हा स्वबळावर जिद्दीने आपल्या परिस्थितीची जाण ठेवून घरच्या घरी केलेल्या तयारीने भारतीय नौदलात Indian Navy SSR पदावर निवडला होता. यापदी निवड झाल्यानंतर तो नुकतीच ट्रेनिंग पूर्ण करून गावी आलेला आहे. इतर विशेष तयारीसाठी हालाखीची परिस्थिती असल्याने त्याने घरूनच तैयारी करून हे यश मिळवले असल्याने गावकऱ्यांना शुभमचे विशेष कौतुक आहे. तुर्तास तो INS चिल्का (ओडिशा) मध्ये प्राथमिक सैन्य प्रशिक्षण पूर्ण करून गावी आलेला आहे. नेहमीच अशा होतकरुंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या अविनाश उगले यांचेकडूनही सत्कार करण्यात आला. क्षेत्र कोणतेही असो. अंबाजोगाई शहर आणि परिसरातील अशा होतकरुंच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभे असणाऱ्या सामाजिक चळवळीतील अविनाश उगले यांनी भावी पिढीला व वैयक्तिक शुभम विष्णू उगले यास प्रोत्साहन मिळावे म्हणून शुभम यांची भारतीय नौसेनेत निवड झाल्याबद्दल त्यांचे सत्काररुपी अभिनंदन केले. ते करताना राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सचिव अविनाश उगले यांच्यासोबत दत्तात्रय उगले, ओमकार उगले, अक्षय उगले, अविनाश ढोले आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोमातेची सेवा करून व संरक्षण-संवर्धन करा : संतोष महाराज गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज



**शांताराम मगर**

**वैजापूर :** भगवान श्रीकृष्णाने गायीला जवळ केले, तिच्यासाठी वेणुवादन केले, गायींना चरण्यासाठी नेले, त्यांचे रक्षण केले, तसे आपणही गोमातेच्या ऋणात राहूया आणि गोसेवेस सुरुवात करूया. गोमातेची सेवा करायला आणि चारा घालायला विसरू नका, असे प्रतिपादन ह.भ.प. संतोष महाराज गायकवाड यांनी तलवाडा येथील किर्तनात केले.

मराठवाड्याचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या वैजापूर तालुक्यातील तलवाडा येथील हनुमान मंदिर 89 वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या हनुमान मंदिराचा मधिल वर्षी जिर्णोद्धार करण्यात आला. मंदिराचा पहिला वर्धापन दिन स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्ष व श्रीकृष्ण जन्माष्टमी याचे औचित्य साधुन इंडियन आयडॉलमध्ये गायलेले राहुल खरे, उत्कृष्ट तबला वादक कुष्णा महाराज पाराळकर, पुरुषोत्तम महाराज यांनी भजन व देशभक्तीपर गीते सादर करण्यात आले. सकाळी ह.भ.प. संतोष महाराज गायकवाड यांचे कीर्तन झाले. यावेळी कु.ऊ.बा.सभापती भागिनाथ मगर, पंचायत समिती मा उपसभापती राजेंद्र मगर, राजाभाऊ निकम, पुरुषोत्तम महाराज, चांगदेव महाराज, भाऊसाहेब मगर, जनार्दन मगर, दादाभाऊ मगर, संतोष सुर्यवंशी, विठ्ठल मगर, सुभाष मगर, किशोर मगर, वसंत मगर, चेअरमन राजेंद्र मगर, रवि मगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

संतोष महाराज गायकवाड बोलताना म्हणाले, गोपाष्टमीच्या निमित्ताने गोमातेची सेवा करायला आणि गाय-वासराला चारा घालायला विसरू नका. भगवान श्रीकृष्णाने गायीला जवळ केले, तिच्यासाठी वेणुवादन केले, गायींना चरण्यासाठी नेले, त्यांचे रक्षण केले, तसे आपणही गोमातेच्या ऋणात राहूया आणि आजपासुन गोसेवेस सुरुवात करूया गोमातेची सेवा करायला आणि चारा घालायला विसरू नका. भारतीय संस्कृतीप्रमाणे गायीला फार महत्त्व आहे. तिला माताही म्हणतात. ती सात्त्विक असल्याने सर्वांनी या पुजनाद्वारे तिच्या सात्त्विक गुणांचा स्वीकार करावयाचा आहे. आज श्रीकृष्ण जन्माष्टमी यानिमित्ताने वसुबारसेला आपण जशी गाय वासराची पूजा केली, तशीच पुजा किंवा त्यांची सेवा करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे अभिप्रेत आहे. सत्त्वगुणी, म्हणजेच आपल्या सहवासाने दुसऱ्याला पावन करणाऱ्या, आपल्या दुधाने समाजाला बलिष्ठ करणाऱ्या, आपले अंग-प्रत्यंग अर्पण करून समाजाला उपयोगी पडणाऱ्या, शेतीला आपल्या शेणाद्वारे खत देऊन पौष्टिकत्व आणणाऱ्या, शेतीला उपयुक्त अशा बैलांना जन्म देणाऱ्या, श्रीकृष्णाला प्रिय असलेल्या व सर्व देवांनी तिच्यात वास्तव्य करावे, अशी योग्यता असलेल्या गोमातेचे पूजन करतात. ज्या ठिकाणी गोमातेचे संरक्षण-संवर्धन होऊन तिला पूज्यभाव देऊन तिचे पूजन होते.

गाईला हिंदू धर्मात मातेचे स्थान दिले जाते आणि गाईमध्ये 33 कोटी देव सामाविष्ट असतात असे वैदिक धर्मग्रंथात नमूद केले आहे. जन्माष्टमी म्हणजे गोकुळ अष्टमी उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपालकाला असे म्हणतात. दहीहंडी आणि कृष्णजन्माष्टमी यांच्या निमित्ताने हा प्रसाद तयार केला जातो. श्रीकृष्णजयंती व्यतिरिक्त वर्षभरात जेव्हाजेव्हा काल्याचे कीर्तन होते तेव्हा तेव्हा त्या कीर्तनानंतर गोपालकाला होतो. म्हणूनच त्या किर्तनाला "काल्याचे" कीर्तन म्हणतात. ज्ञानेश्वरीचे पारायण, किंवा अनेक दिवस चालणाऱ्या ग्रंथवाचनानंतर, अथवा कीर्तन महोत्सवामध्ये शेवटच्या दिवशी काल्याचे कीर्तन होते. वारकरी संप्रदायात सांगता गोपाळकाला करूनच होते.

कृष्ण जयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात या उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीकाला होतो व त्याचे सेवन करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे आला । गोकुळात आनंद झाला ॥ असे गाणे गात अनके लहानथोर पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात. या दिवशी महाराष्ट्रात, विशेषतः मुंबईत, उंच मडक्यात दही-दुधाने भरलेला हंडा ठेवून तेथपर्यंत मानवी मनोऱ्यावरून पोहचून तो हंडा फोडण्याचा 'गोविंदा' हा साहसी खेळ होतो. हा महाराष्ट्रातील एक वैष्णव नृत्योत्सव आहे. श्रीकृष्णाने व्रज मंडळात गाई चारताना आपण व आपले सवंगडी या सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र करून त्या खाद्य पदार्थांचा काला केला व सर्वांसह त्याचे भक्षण केले अशी कथा आहे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा आहे.

गोपाल म्हणजे गायीचे पालन करणाऱ्या कृष्णाच्या या जन्मोत्सवाच्या निमित्ताने काल्याचा प्रसाद केला जातो. काला म्हणजे एकत्र मिळविणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, धानाच्या लाह्या, दही, ताक, साखर, इत्यादी घालून केलेला एक खाद्यपदार्थ. हा कृष्णास फार प्रिय होता असे मानले जाते. श्रीकृष्ण व त्याचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर हा तयार करीत असत व वाटून खात असत. गोपाळकाला' हा श्रीकृष्णाच्या विविधांगी पूर्णावतारी कार्याचे प्रातिनिधीत्व करतो. काल्यातील प्रमुख घटक दही, दूध, ताक व लोणी हे काल्यातील प्रमुख घटक त्या त्या स्तरावरील भक्तीचे निदर्शक आहेत, असे विविध कृष्णाच्या लिला सावंत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या प्रसंगी अपघाती निधन झालेले विनायक मेटे यांना सामुदायिक श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येत हजर होते.

# 'पँगाँग'वर चिनी पूल !

आधुनिक केसरी

चीन प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ (एलएसी) उत्तर लडाखमध्ये पँगाँग तलावावर दोन पूल बांधत असल्याचे दावे मागील काही दिवसांपासून केले जात होते. मात्र आता या ठिकाणी चीन एकच मोठ्या आकाराचा पूल उभारत असल्याची माहिती इंडिया टुडे टीव्हीने उपग्रहांच्या माध्यमातून काढलेल्या छायाचित्रांच्या मदतीने दिली आहे. या पुलाचा वापर मोठ्या आकाराच्या अवजड लष्करी वाहनांना करता येईल इतके हे भक्कम बांधकाम असल्याचे सांगितले जाते आहे. नेमका हा पूल कुठे उभारण्यात आला आहे? तो चीनसाठी फायद्याचा कसा आहे? यावर भारताने काय भूमिका घेतली आहे? अमेरिकेतील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनी असणाऱ्या प्लॅनेट लॅब पीबीसीने उपग्रहांच्या माध्यमातून काढलेल्या फोटोंमध्ये या तलावावरील पुलाचे बांधकाम सुरु असल्याचे दिसत आहे. हे फोटो १५ ऑगस्ट रोजी काढण्यात आले आहेत. या पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर चीनच्या पिपल्स लिब्रेशन आर्मी म्हणजेच पीएलएच्या लष्करी तुकड्यांबरोबरच मोठ्या आकाराची लष्करी वहाने, लष्करी साहित्य आणि फौजफाटा या तलावाच्या उत्तरेला आणि दक्षिणेला सहज पोहचवता येईल. चीनकडून उभारण्यात येणाऱ्या या पुलामुळे खुरांक किल्ला ते तलावाच्या उत्तरेकडील बाजूदरम्यानचा प्रवासाचा वेळ हा १२ तासांवरुन चार तासांवर येईल. या तलावाच्या दक्षिणेला असणाऱ्या भागामध्येच २०२० साली भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये संघर्ष झाला होता. या पुलाच्या खाली गस्त घालणाऱ्या बोटींना ये जा करण्यासाठी जागा ठेवण्यात आली आहे की नाही हे सध्या उपलब्ध फोटोंवरुन स्पष्ट होत नाहीत. या पुलाचे दक्षिणेकडील बांधकाम शिल्लक असल्याचे दिसत आहे. या पुलामुळे रुतोगमधील मोठा भाग चीनच्या लष्करी तळाशी जोडला जाणार आहे. या पुलाचा वापर करुन अत्यंत वेगाने चीनला लष्करी हलचाल करणे शक्य होणार आहे. नुकत्यास समोर आलेल्या उपग्रहांच्या माध्यमातून काढलेल्या फोटोंमध्ये रुतोगमध्ये सातत्याने चीन मूलभूत सेवांची उभारणी करताना दिसत आहे. मागील वर्षी दोन्ही देशांमधील चर्चेनंतर येथील तलावाच्या उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यांसंदर्भातील नियमांमध्ये बदल करण्यात आल्यापासून चीनने या भागात वेगाने विकासकामे केली आहेत. भारत आणि चीनमधील वादाच्या पार्श्वभूमीवर हा पूल वेगाने उत्तर देण्यासाठी बांधण्यात आला असणार. या पुलामुळे पीएलएच्या हलचालींना फार वेग मिळणार आहे, असे निरीक्षण चीन पॉवर नावाच्या संरक्षणासंदर्भातील अभ्यास करणाऱ्या गटाने नोंदवले आहे. हा पूल सध्या ३० मीटर रुंदींचा आहे. भारताने या बांधकामावर प्रतिक्रिया देताना, बांधकाम बेकायदेशीर आहे, असे म्हटले आहे. भारताने यापूर्वीही या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना या घडामोडींवर आमचे लक्ष असल्याचे म्हटले होते. हा पूल चीनने बेकायदेशीपणे ताब्यात घेतलेल्या भागावर उभारला आहे. ६० वर्षांपूर्वी त्यांनी हा भाग ताब्यात घेतल्या. आज आपल्या सर्वांना ठाऊक आहे त्याप्रमाणे भारताने कधीच या बेकयादेशीर ताब्याला कधीच मान्यता दिलेली नाही, असे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. त्याचप्रमाणे भारत सरकारने २०१४ पासून सीमा भागांमध्ये मोठ्याप्रमाणात पायाभूत सुविधांची उभारणी करण्याला भर देण्यास सुरुवात केल्याचेही म्हटले आहे. यामध्ये रस्ते आणि पुलांचा प्रामुख्याने समावेश आहे. चीनच्या झियांग या लष्करी तुकडीचे हेलिकॉप्टर्स याच महिन्यात प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या अगदी जवळून गेली होती. उत्तर लडाखबरोबरच चिनी लष्कराने काराकोरम डोंगररांगांच्या उत्तरेला पाच ठिकाणी लष्करी सराव केला होता.

# स्वातंत्र्याची पंचाहत्तरी समजून घेताना...



प्रा. शिवाजी वाठोरे

आधुनिक केसरी

**घरा-घरात चुली पेटल्या पाहिजेत. माणसं जगली पाहिजेत. त्यांच्या किमान अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, आणि शिक्षण ह्या मूलभूत गरजा तरी भागल्या पाहिजेत. शेतमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे. कामगारांच्या हाताला काम, बेरोजगारीचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे. उपाशीपोटी कुणीही झोपणार नाही, याची काळजी घेतली गेली पाहिजे. सत्ताधारी मंडळीकडून एवढी माफक अपेक्षा करण्यात काय गैर आहे? पण देशाची वाटचाल लोकशाही कडून भांडवलशाहीकडे होत असताना बुद्धिजीवी म्हणविणारे मुक्या-बहिऱ्याचे सोंग घेत असतील तर सामान्यजनांनी कोणाच्या तोंडाकडे बघावे? हा खरा प्रश्न आहे.**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशभर मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होतो आहे. आपण नुकताच भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. या निमित्त शासकीय स्तरावर काही इव्हेंट करण्याचे जसे आदेश दिले गेले होते. सामाजिक स्तरावरही ' घर घर तिरंगा ' लावण्याचे आवाहनवजा आदेश देण्यात आले होते. त्याबरहुकूम जनतेने १३ ते १५ ऑगस्ट असे तीन दिवस आपापल्या घरावर राष्ट्रध्वज फडविण्याचे काम अत्यंत निष्ठेने केले. मुळात देशाभिमान इथल्या प्रत्येक माणसाच्या रंध्रा-रंध्रात आहे, नसा-नसात आहे, रक्ता-रक्तात आहे, श्वासा-श्वासात आहे. हे नव्याने सांगण्याची गरज नाही. त्याना देशप्रेमी असल्याचे प्रमाणपत्र कोणाकडून घेण्याची आवश्यकता नाही. तरीही सत्ताधारी अशा चाचपण्या अधून मधून करीत असतात. त्यांना बघायचे असते, की लोक आपल्या आदेशाचे किती पालन करतात. आपले ऐकणारा देशभक्त. साहजिकच जो ऐकत नाही, विरोध करतो, तो देशद्रोही. किती गुळगुळीत करून टाकल्यात व्याख्या!
त्यात 'घर घर तिरांगा' असा नारा. 'घर घर राष्ट्रध्वज' असेच का? 'घर घर राष्ट्रध्वज ' असे का नाही? असा प्रश्न माझ्यासारख्या काही विद्यार्थ्यांना पडला. घर घर राष्ट्रध्वज म्हटले, की त्यात चार रंग येतात. चौथा रंग अशोकचक्राचा जो निळा आहे. औरंगाबाद येथे जिल्हाधिकाऱ्यांनी आयोजित केलेल्या शासकीय कार्यक्रमात दि. १३ तारखेस जो राष्ट्रध्वज फडकवला त्यातून अशोकचक्र गायब असल्याचे छायाचित्र समाज माध्यमावर झळकले. मग या मंडळींना निळ्या रंगाचा आणि अशोकचक्राचा एवढा दुस्वास का? ते राजा अशोकाची आठवण करून देणारे आहे म्हणून? की तो बौद्ध धर्मीय होता, त्याने बौद्ध धम्मास राजाश्रय दिला म्हणून? म्हणजे जात काही केल्या मनातून जात नाही.
अगदी काल परवाची घटना. राजस्थानमध्ये इयत्ता तिसऱ्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या खालच्या जातीतील एका चिमुकल्याला तहान लागली म्हणून त्याने हेडमास्तरसाठी असलेल्या पाण्याच्या माठातले पाणी घेतले तर उच्चवर्णीय हेडमास्तरने त्याला ठार मारावे? काय म्हणावे या जातीय पाशवी वृत्तीला? पन्नास वर्षांपूर्वी म्हणजे १५ ऑगस्ट १९७२ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने 'साधना'च्या एका विशेषांकात सामाजिक चळवळीचे अग्रणी पँथर नेते राजा ढाले यांनी ' काळा स्वातंत्र्य दिन' या शीर्षकाचा एक लेख लिहून काही प्रश्न उपस्थित केले होते. मग ते बेरोजगारीचे असतील, जातिवादाचे असतील, महागाईचे असतील. स्वातंत्र्याचे हक्क आणि कर्तव्याचे असतील. आजही त्यात काही बदल झाला आहे काय? या प्रश्नाचे उत्तर आपणास नकारार्थीच द्यावे लागेल. सामान्य माणसाचे प्रश्न जसेच्या तसेच असतील, त्यांच्या हाल अपेष्टात दिवसेंदिवस वाढच होत असेल तर असे स्वातंत्र्य भारतीयांना अपेक्षित होते काय?
एखादी बाई देशाला १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले नाही तर ते २०१४ ला मिळाले असे म्हणते. तेव्हा ती सहज म्हणत नसून त्या पाठीमागे प्रतिक्रांतिवादी विचारांचा मोठा पाठिंबा असतो. जाणीवपूर्वक षडयंत्र असते. याचा बुद्धिवादी म्हणवून घेणाऱ्यांनी खरे तर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. देशातील बुद्धिवादी मंडळींनी ठरवले तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. पण तेच झोपलेल्या अवस्थेत असतील वा झोपेचं सोंग घेणारे असतील, तर मात्र उलट्या घड्यावर पाणी टाकल्यासारखेच. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षा नंतरही रस्त्याच्या बाजूला पाल टाकून राहणाऱ्या भटक्या लोकांना निवारा मिळत नसेल, दऱ्या - खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासींचे हाल कुत्रे खात नसतील तर हा दोष कुणाचा? त्या भटक्या-आदिवासींचा? की लोकशाही पद्धतीने मतदान करून संसदेत पाठविलेल्या प्रतिनिधींचा की त्यातून निवडलेल्या मायबाप सरकारचा? अशा स्थितीत सामान्यांना काय संदेश देणार आहोत आम्ही?
स्वातंत्र्य म्हणजे काय?
आम्ही खऱ्या अर्थाने आजही स्वतंत्र आहोत काय? कोणत्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव?
मग नामदेव ढसाळ सारखा एखादा विद्रोही कवी 'स्वातंत्र्य कंच्या * चे नाव?' असा प्रश्न उपस्थित करीत असेल तर त्यात त्याचा काय दोष? ज्या इंग्रजांच्या नावाने आपण रात्रंदिवस खडे फोडतो, त्याच इंग्रजांनी येथे मराठी शाळासाठी अनुदान मंजूर केलेले होते. आज शासनकर्ते, आहे ती अनुदाने बंद करीत आहेत. शासनाच्या मराठी शाळा बंद पडतील याचे नियोजनबद्ध कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत. कर्नाटक मध्ये तर सरकारी शाळेत प्रवेशासाठी मोठी फिस भरा. खासगी शाळेत प्रवेश घेतल्यास तुम्हाला पैसे मिळतील. असे प्रलोभन देत आहेत म्हणे. भटक्या विमुक्त, आदिवासींच्या मुलांनी उच्च शिक्षण घेऊच नये, याची व्यवस्था करण्यात येते आहे.
ज्या इंग्रजांना आपण परके म्हणतो त्यांनीच येथील अमानुष सतीची चाल बंद केली. विधवा विवाहास कायद्याने संमती दिली. चले जाव म्हणत त्या काळात आम्ही त्यांच्या विरोधात संघर्ष केला. आता स्वकीयच सत्ताधारी आहेत. तेव्हा स्वकियाच्याच विरोधात संघर्ष करण्याची वेळ येते आहे. संघर्ष हे मुर्दाड मनाच्या माणसाचे काम नाही.
स्वातंत्र्यपूर्व काळात सावित्रीमाई फुले यांनी आपल्या 'काव्यफुले' या संग्रहात अशा मुर्दाड मनाच्या लोकांसाठी प्रश्न उपस्थित केला आहे,

'ज्ञान नाही विद्या नाही
ती घेणेची इच्छा नाही
त्यास माणूस म्हणावे काय?'

सद्य स्थितीत या वृत्तीत काही फरक पडला आहे काय, याचाही विचार होण्याची गरज आहे. इंग्रजांनी या देशात काय सुधारणा केल्या याबाबतही सावित्रीमाईंनी नोंद केली आहे. त्या लिहितात,

'ज्ञानदाते इंग्रज आले
विद्या शिकून घ्यारे
ऐसी संधी आली नव्हती
हजार वर्षे रे'

हजारो वर्षे, पिढ्यान् पिढ्या येथील बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवणारे काय इंग्रज होते? या देशात सामाजिक गुलामगिरी कुणी निर्माण केली? इंग्रजांनी? आज एक आदिवासी समाजाच्या द्रौपदी मुर्मू महामहीम राष्ट्रपतीपदी विराजमान झाल्याने सर्वत्र गवगवा करण्यात येत आहे. या एका निवडीने आदिवासींचे सर्व प्रश्न मिटले काय? ह्या बाई आदिवासी समाजाशी प्रामाणिक आहेत, की त्यांच्या राजकीय पक्षाशी? याचे उत्तर काय असेल हे सांगण्यासाठी कोण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. यापूर्वी रामनाथ कोविंद या दलित समाजाच्या माणसाने काही वर्षे राष्ट्रपतीपद उपभोगले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी दलितांचे कोणते आणि किती भले केले? याचा लेखा - जोखा मागण्यासाठी आम्ही कधीतरी गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही? शिक्षणामुळे ऊर्जा येणे साहजिकच. बाबासाहेब तर शिक्षणाला 'वाघिणीचे दूध ' संबोधतात. मात्र, याबाबत आदिवासींच्या शैक्षणिक स्थितीच्या सर्वेनुसार केवळ दोन टक्के आदिवासी उच्च शिक्षण घेत असल्याची आकडेवारी समोर येते आहे. सुशिक्षित बेरोजगारांची पूर्वी गणना तरी व्हायची. या मायबाप सरकारने गणना बंद करून टाकली. म्हणजे किती सुशिक्षित बेरोजगार आहेत, ते गुलदस्त्यातच. ओ.बी.सी.ची तर आकडेवारीच कमी करून टाकली. ज्या-ज्या शासकीय संस्था पैसे मिळवून देणाऱ्या आहेत, त्या विकण्याचा सपाटा लावलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. टी. व्ही. आणि रेडिओवरील बातम्यांमध्ये सरकारी धोरणांची भलावण असते. विविध चॅनल्स वाले घसा फुटेपर्यंत राज्यकर्त्यांचा उदो-उदो करीत असतात. जे करीत नाहीत, ते चॅनल्स बंद होतात किंवा प्रश्न विचारणारे पत्रकार नोकरी गमावतात. असे हे स्वातंत्र्य!

**(लेखक कवी, सामाजिक चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात. देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून तो दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

आज २० ऑगस्ट, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची आज ७८ वि जयंती. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते. राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला.
राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे



बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या चिंताजनक!

आधुनिक केसरी

**विद्यार्थ्यांच्या वाढणाऱ्या आत्महत्या ही अगदी राज्यासाठीच नव्हे तर देशासाठी चिंताजनक विषय ठरत आहे. नैराश्य व विविध कारणातून अनेक विद्यार्थी आत्महत्या करत असल्याने त्या कुटुंबासमोर एक फार मोठे आव्हान तर ठरत आहे पण तरुणांच्या वाढत्या आत्महत्येने आपण तरुण पिढी गमावत आहोत जी देशासाठी चिंताजणक ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्याआत्महत्या खरोखरचं देशासमोरचं नवं संकट म्हणून उभं ठाकलय.विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे कारण काय? या आत्महत्या कशा रोखता येईल या विषयावर चर्चा व विचारमंथन होणे आवश्यक आहे.**


विविध कारणांस्तव होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्या हा सध्या चिंतेचा विषय झाला आहे. स्वप्नील लोणकर या होतकरू तरुणाने केलेल्या आत्महत्येने पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या व त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या आत्महत्या रोखायच्या असतील तर विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे समुपदेश होणे गरजेचे आहे.विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याची गरज आहे.

विद्यार्थ्यांच्या वाढणाऱ्या आत्महत्या ही अगदी राज्यासाठीच नव्हे तर देशासाठी चिंताजनक विषय ठरत आहे. नैराश्य व विविध कारणातून अनेक विद्यार्थी आत्महत्या करत असल्याने त्या कुटुंबासमोर एक फार मोठे आव्हान तर ठरत आहे पण तरुणांच्या वाढत्या आत्महत्येने आपण तरुण पिढी गमावत आहोत जी देशासाठी चिंताजणक ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्याआत्महत्या खरोखरचं देशासमोरचं नवं संकट म्हणून उभं ठाकलय. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे कारण काय? या आत्महत्या कशा रोखता येईल या विषयावर चर्चा व विचारमंथन होणे आवश्यक आहे.

अभ्यास, स्पर्धा, नातेसंबंधांमधील तणाव, वाढती बेरोजगारी , अपेक्षाभंग, प्रेमभंग अशा अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून नोंदवले जात आहे. विद्यार्थी आत्महत्येचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक आहेत.मागील पाच वर्षात महाराष्ट्रात ७२१९ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. त्यानुसार रोज चार विद्यार्थी आत्महत्या करतात,अशी धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

एमएचआरडी, नॅशनल क्राईम ब्युरो, व इतर अहवालानुसार देशातील सर्वाधिक विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण महाराष्ट्र राज्यातच जास्त आहे.देशात दर तासाला १ विद्यार्थी, तर प्रत्येक दिवसाला २८ विद्यार्थी आत्महत्या करतात.प्रत्येक ७ विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमागील १ विद्यार्थी महाराष्ट्राचा असतो; तर दर दिवशी राज्यात ४ विद्यार्थी आत्महत्या करतात.१५ ते ३९ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये



विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आत्महत्या केलेल्या आहेत. सलग घडणाऱ्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.

विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही महाविद्यालये, शिक्षणसंस्था, पालक समाज व देशासाठी या सर्वासाठीच चिंतेचा विषय ठरला आहे. विद्यार्थ्यां आत्महत्या संबंधित कुटुंबा पुरता हा प्रश्न नसून तो सामाजिक प्रश्न बनला आहे.त्यामुळे यावर तोडगा काढण्याची गरज आहे. मात्र, अजूनही बहुतेक महाविद्यालयांमध्ये समुपदेशनाची सुविधा नाही. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या पाश्वभूमीवर महाविद्यालयांनी समुपदेशक नेमण्याबाबत शासनाने दोन वर्षांपूर्वी सूचना दिल्या होत्या. मात्र, समुपदेशक नेमणे हा 'नियम' नसल्यामुळे काही अपवाद वगळता महाविद्यालयांनी याकडे दुर्लक्षच केल्याचे दिसत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडूनही समुपदेश सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी मिळू शकतो. मात्र, त्यासाठीही महाविद्यालये अर्ज करताना दिसत नाहीत.

**विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची कारणे काय?**

वाढती बेरोजगारी, करिअरची चिंता, पालकांच्या वाढत्या अपेक्षा, वाढती स्पर्धा, संयमाचा अभाव, मानसिक ताण तणाव, खाजगीकरण, नोकऱ्यांचा अभाव, नोकऱ्यांमधील गैरव्यवहार, राजकीय हस्तक्षेप, कुटुंबाचे कर्ज, शैक्षणिक कर्ज, गरिबी, वाढती वयोमर्यादा, रखडलेल्या विविध स्पर्धा परीक्षांचे निकाल, आदी कारणातून विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे.

प्रा. डॉ सुधीर अग्रवाल
मो. 9561594304

आत्महत्या करणारे बहुतेक विद्यार्थी हे १८ ते २५ वर्षे वयोगटातील आहेत. वाढलेला अभ्यास, स्पर्धा यांमुळे विद्यार्थ्यांना ताणाला तोंड द्यावे लागत आहे. विद्यार्थ्यांमध्येही प्रतिष्ठेच्या, यशाच्या संकल्पानांमध्ये फरक पडत आहे. काळाबरोबर नातेसंबंधांमध्येही फरक पडत चालला आहे. अनेकदा स्वतःबद्दलच्या कल्पना, स्वतःचा कल यांबाबतही विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम असतो. त्यामुळे घडलेली एखादी घटना स्वीकारण्याची, काही वेळी नकार पचवण्याची विद्यार्थ्यांची मानसिक तयारी दिसत नाही. अनेकदा परीक्षा, स्पर्धा यांमध्ये यशस्वी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांनीही आत्महत्येचा मार्ग स्वीकारलेला दिसतो. संवादाचा अभाव हे कारण त्यामागे दिसून येते.

**आत्महत्या रोखण्यासाठी काय करता येईल?**

विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमागे वाढलेली स्पर्धा हा भाग आहेच. मात्र, त्यापेक्षाही संवादाचा अभाव हा मोठा घटक दिसतो. बदलेल्या कुटुंब पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांचा घरात संवाद आणि त्यांना मिळणारा आधार कमी झाला आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांवर नक्कीच उपाययोजना करणे शक्य आहे. ज्या महाविद्यालयांमध्ये मानसशास्त्र विभाग आहेत, त्यातील शिक्षक प्राथमिक समुपदेशन करू शकतील. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निधीचा वापर करून हेल्पलाइन तयार करणे, शिक्षकांना प्राथमिक समुपदेशनासाठी प्रशिक्षण देणे असे उपाय करता येऊ शकतात. त्याचप्रमाणे विद्यार्थिनींच्या कक्षामध्ये त्यांच्यासाठी मार्गदर्शन करणारी पुस्तके उपलब्ध करून देणे याचाही उपयोग होऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या लक्षात घेऊन त्यांना आधार देण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांनी चार भिंतीच्या आत काम करण्यापेक्षा पुढे येणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळेमध्ये समुपदेशन केंद्र स्थापन करून व्याख्याने किंवा चित्रप्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांची मानसिकता उंचावण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्यात आत्मविश्वास वाढविला पाहिजे. तरच विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याला मदत होईल आणि लहान जीवांना नवसंजीवनी मिळेल. शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया आहे. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाबरोबर मानसिक, बौध्दिक, शारीरिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी 'जाणीव जागृती' होणे आवश्यक आहे. तरच, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या आत्महत्या रोखण्याला मदत होईल.

# निवडणुकीतील आश्वासनावर अंकुश हवाच



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**राजकीय पक्षांची ही आश्वासने स्वार्थी व मतदारांची दिशाभूल करणारी असतात.यामुळेच मतदारांच्या व सर्वसामान्यांच्या भावना दुखावतात. कारण यांच्या आश्वासने राज्याचा किंवा देशाचा यत्किंचितही विकास होत नाही. कोणताही राजकीय पक्ष असो त्यांनी निवडणूक काळात दिलेले आश्वासन पूर्ण करूच शकत नाही. अशा वेळी सत्तेत आल्यानंतर अनेक कारणे सांगून दिलेल्या आश्वासनापासुन पळ काढतात.याकरीता यावर मोठ्या प्रमाणात चर्चा होने गरजेचे असुन लोकसभा अध्यक्ष, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री व तज्ज्ञमंडळी यांनी याबाबत सविस्तर चर्चा करून जनतेची दिशाभूल करणाऱ्या आश्वासनावर अंकुश लावायला हवा.**

निवडणुकीच्या प्रचारमोहिमांमध्ये राजकीय पक्षांकडून देण्यात येणारी मोफतची आश्वासने न्यायालय रोखू शकत नाही. मात्र योग्य आश्वासने नेमकी कोणती आणि सरकारी निधी खर्च करण्याचा योग्य मार्ग कोणता, हा महत्त्वाचा प्रश्न आहे, अशी स्पष्टोक्ती सर्वोच्च न्यायालयाने 17 ऑगस्टला केली. त्याचप्रमाणे मोफतच्या आश्वासनांची व्याख्या सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे, असेही खंडपीठाने स्पष्ट केले आहे. देशातील लोकसभा, विधानसभा, महापालिका किंवा इतर कोणत्याही निवडणुका असो अशा वेळेस राजकीय पक्ष मतदारांना आपल्याकडे मोहीत करण्यासाठी व स्वतःच्या स्वार्थासाठी मोठमोठे लॉलीपॉप देतात. यात कोणी मोफत वस्तू वाटतात तर कोणी आश्वासनाची खैरात वाटते. अशा परिस्थितीत मतदाता चलबिचल होतो.परंतु राजकीय पक्षांची ही आश्वासने स्वार्थी व मतदारांची दिशाभूल करणारी असतात.यामुळेच मतदारांच्या व सर्वसामान्यांच्या भावना दुखावतात. कारण यांच्या आश्वासने राज्याचा किंवा देशाचा यत्किंचितही विकास होत नाही. कोणताही राजकीय पक्ष असो त्यांनी निवडणूक काळात दिलेले आश्वासन पूर्ण करूच शकत नाही. अशा वेळी सत्तेत आल्यानंतर अनेक कारणे सांगून दिलेल्या आश्वासनापासुन पळ काढतात. याकरीता यावर मोठ्या प्रमाणात चर्चा होने गरजेचे असुन लोकसभा अध्यक्ष, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री व तज्ज्ञमंडळी यांनी याबाबत सविस्तर चर्चा करून जनतेची दिशाभूल करणाऱ्या आश्वासनावर अंकुश लावायला हवा. राजकीय पुढाऱ्यांच्या मोफत वस्तू वाटप व खोकला आश्वासनाला जनतेचाच बळी का जावा? निवडणुकांच्या काळात राजकीय पुढारी आश्वासने देऊन व मोफत वस्तुंची लालसा दाखवून जनतेची व लोकशाहीची घोर थट्टा करताना दिसतात. मोफत वस्तू व आश्वासनाची खैरात यावर केंद्र सरकारने दिशा निर्देश जाहीर करावे. लोकांना काही वस्तू मोफत देणे म्हणजे नेमके काय? आधी त्याची व्याख्या निश्चित करण्यात यावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. लोकांच्या कल्याणासाठी शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी यासारख्या सेवा मोफत देणे व सरकारी तिजोरीतून खर्च होणारा पैसा यात कोठेतरी समन्वय साधावा लागेल असे सर्वोच्च न्यायालयाने म्हणने आहे. याबाबद सध्या सुनावणी सुरू आहे.मुख्यत्वेकरून राजकीय पुढाऱ्यांनीच ऐन निवडणुकीच्या काळात लोकांचा मतांचा कौल आपल्याकडे यावा यासाठी राजकीय पुढारी मोफत वस्तूंचे वाटप व खोट्या आश्वासनाचा पाऊस पाडतात. परंतु निवडणुका संपल्यानंतर संपूर्ण आश्वासने राजकीय पुढारी व ज्यांची सरकार स्थापीत होते ते या सर्व गोष्टी विसरतात. त्यामुळे मोफत वस्तूंचे वाटप किंवा खोटी आश्वासने यांचे दोषी मुख्यत्वेकरून राजकीय पुढारीच आहेत असे मला वाटते. अनेक राज्यांत आमदार किंवा खासदार गाव दत्तक घेतात व संपूर्ण विकासाचे आश्वासन देतात. परंतु विकास तर दुरच रहाला वेळ पडल्यास दत्तक घेतलेल्या गावाकडे वळुनसुध्दा पहात नाही. ही आपल्या लोकप्रतिनिधींची शोकांतिका आहे. आज देशात आपण पाहतो शिक्षण महागले आहे, आरोग्य सुविधा महागल्या, औषधोपचार महागला, अत्यावश्यक सेवा महागल्या, जिवनावश्यक वस्तूंचे भाव आभाळाला टेकले परंतु निवडणूकांच्या काळात आश्वासने देणे अजुनपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाने बंद केले नाही ही लोकशाहीची खुली विटंबना म्हणावी लागेल.निवडनुकीच्या काळात लॅपटॉप, टीव्ही अशा अनेक वस्तू मोफत वाटुन राजकीय पक्ष गरीबांची व सर्वसामान्यांना लालसा दाखवून आपला मतलब साध्य करतात.हा लोकप्रतिनिधी पदाला व लोकशाहीला एक धब्बाच म्हणावा लागेल. मोफत वस्तू व आश्वासने याबाबत सर्वोच्च न्यायालय सुध्दा असमंजस्यतेमध्ये आहे. याकरीता न्यायालयाने मोफत योजनांची व्याख्या ठरविण्यासाठी एक तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा पर्याय केंद्राला दिला आहे. कोणकोणत्या क्षेत्रातील आश्वासने मोफत वस्तू वाटपाच्या गटात येऊ शकतात? निवडणूक प्रचारातील भाषणांची सांगड या मुद्दांशी घालणे योग्य आहे का? मोफत वस्तू वाटप तसेच आश्वासनाची खैरात यांचा प्रतिकूल परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो का? आदी मुद्यांचाही विचार प्रस्तावित समिती करेल असे न्यायालयाने म्हटले आहे. याकरिताच न्यायालयाने केंद्राला निर्देश दिले की आश्वासन व मोफत वस्तू वाटप याबाबतीत आर्थिक समन्वय साधण्याची सूचना दिल्या आहेत.मोफत वस्तू वाटपाबरोबरच, हवेतील घोषणा देणे सुरूच राहीले तर राज्यांना व देशाला मोठे नुकसान होवू शकते यामुळे आर्थिक आपत्ती निर्माण होवून राज्यांना नुकसान होवू शकते. कोणतीही निवडणुक असो जमिनीस्तरावरील विकासासाठी लढविल्या जातात.परंतु राजकीय पुढारी घाणेरड्या राजकरणाची खेळी खेळुन मोफत वस्तू वाटप व खोकला आश्वासने देऊन आमजनतेची दिशाभूल करतात व यामुळे राज्याचा व देशाचा विकास खुंटतो. राजकीर पुढारी निवडुंण आल्यानंतर दिलेले संपूर्ण आश्वासने विसरता व याकरिता अनेक कारणे सांगून दिलेल्या आश्वासनाच्या बाहेर पडतात. महाराष्ट्राचा विचार केला तर अनेक पक्षांचे वेगवेगळे घोषणा पत्र होते गेली 31 महिने आघाडी सरकार रहाली यात तिन्ही पक्षांचे वेगवेगळे घोषणा पत्र होते. मुख्यत्वेकरून कॉंग्रेसच्या घोषणा पत्रात 100 युनिटपर्यंत विज माफकरण्याचे कॉंग्रेसच्या घोषणा पत्रात होते, परंतु सरकार येताच अनेक कारणे सांगून यावर पडदा टाकला व एकाही पक्षाने आपल्या घोषणा पत्राची अंमलबजावनी केली नाही. राजकीय पक्षांच्या घोषणापत्रावर व आश्वासनाला लगाम असने अती आवश्यक आहे. त्यामुळे घोषणा पत्रावर कायद्याचे बंधनसुध्दा अती आवश्यक झाले आहे. कारण राजकीय पुढारी तोंडामध्ये येईल तसे आश्वासने देतात. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या सरकारच्या माध्यमातून, निवडणुक आयोगाच्या माध्यमातून किंवा कायद्याच्या माध्यमातून ताबडतोब आवळल्या पाहिजे. अन्यथा राज्याच्या व देशाच्या विकासाला तडा जाऊ शकते.

# सम्राट अशोकाची मुलगी चारुमती

आधुनिक केसरी

बौद्ध साहित्यात सम्राट अशोक राजाची मुलगी संघमित्रा आणि मुलगा महेंद्र बद्दल खूप माहिती वाचण्यात आलेली आहे. परंतु सम्राट अशोक राजाला दुसरीही एक मुलगी होती आणि तिचे नाव चारुमती होते हे जास्त कोणाला ज्ञात नाही. सम्राट अशोक राजास पाच राण्या होत्या, त्या पैकी असंधिमित्रा ही दुसरी होती. तिने अशोक राजापासून दासीला झालेली कन्या दत्तक घेतली होती. तिचे नाव चारुमती होते. ती मोठी झाल्यावर तिचा विवाह नेपाळ येथील देवपाल क्षत्रिय या राजकुमारा बरोबर करण्यात आला. तेव्हापासून चारुमती ही तेथेच राहात होती. पित्याच्या पावलावर पाऊल ठेवत तिनेसुद्धा काठमांडूच्या खोऱ्यात थेरवादी बुद्ध धम्माचा प्रचार केला. अशोक राजाच्या उतारवयात जेव्हा पुत्र महेंद्र आणि मुलगी संघमित्रा श्रीलंकेत स्थायिक झाले होते तेव्हा पित्याची काळजी चारुमतीने घेतली. तसेच त्याच्याबरोबर तिने धम्मयात्रा सुद्धा केली. तिच्या कारकिर्दीत तिने देवपटन येथे स्तुप बांधला तो चारुमती स्तूप म्हणून ओळखला जावू लागला. मात्र गेल्या हजारो वर्षात तो स्तुप हळूहळू विस्मरणात गेला. पुढे त्याचे नाव धनधोज स्तुप झाले व एक जुनी टेकडी म्हणून त्याची ओळख राहिली. तसेच त्याच्या आजूबाजूस वस्ती वाढल्याने त्याकडे दुर्लक्ष झाले. पुरातत्व खात्यालासुद्धा चारुमती स्तुप कुठे आहे हे ज्ञात होत नव्हते.

परंतु २००२ मध्ये धनधोज स्तूपाचे नूतनीकरण करण्याचे काम हाती घेतले तेव्हा तेथील उत्खननात असंख्य छोट्या स्तूपांच्या प्रतिकृती सापडल्या. तसेच शंभराच्यावर लहान बुद्ध मूर्ती सापडल्या.आणि मुख्य म्हणजे तेथील विटांवर चारू-व- ती असे ब्राम्ही लिपीत कोरलेले आढळले. तसेच स्फटिका बरोबर सोने-चांदी यांची किरती, लिच्छवि आणि मल्ल यांच्या काळातील नाणी सापडली. तेथील पुरातत्ववेत्ते प्रकाश दर्नल यांनी सांगितले की विटेवर धम्मचक्राचा ठसा असून, दोन स्वस्तिक चिन्हे व चारुमतीचे नाव आढळल्यामुळे हा महत्वाचा स्तुप इतकी वर्षे दुर्लक्षित कसा राहिला याचे आश्चर्य वाटते.

श्रीलंकेतील बौद्ध साहित्यात चारुमती स्तूपाबाबतची माहिती दिली आहे. त्यामुळे नेपाळमध्ये जेव्हा चारुमतीचा स्तुप ओळखला गेला तेव्हा मार्गदर्शनासाठी व नूतनीकरणाच्या देखरेखीसाठी श्रीलंकेतील भिक्खू आले होते. त्यावेळेस केलेल्या आव्हानानुसार प्राप्त झालेल्या दानामधून त्याचे नुतनीकरण केले गेले. आता चारुमती स्तुप हळूहळू पर्यटकांचे आकर्षण होत आहे.

**संकलन : सुजीत ताजने**
**औरंगाबाद 9822444011**

# करण पवारच्या कुटूंबियांना तत्काळ मदत जाहीर करा : प्रा.लखन चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** औरंगाबाद येथे सुरु असलेल्या अग्निपथ सैन्य भरतीसाठी कन्नड तालुक्यातील विठ्ठलवाडी येथील तरुण करण पवार हा सैन्य भरतीसाठी आला होता. भरतीच्या तीन फेरी उत्तीर्ण झाल्यानंतर चौथ्या फेरीत तो धावत असताना त्याला अचानक चक्कर येऊन तो खाली पडला. त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा मृत्यू झाला असून शासनाने करण पवारच्या कुटूंबियांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करुन त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करावा अशी मागणी प्रा. लखन चव्हाण यांनी केली आहे.
करण नामदेव पवार हा कन्नड तालुक्यातील विठ्ठलवाडी या छोट्याशा गावातील तरुण गेल्या सहा वर्षांपासून सैन्य भरतीसाठी खूप मेहनत करत होता. एक वर्षापूर्वी त्याची आईची पण दुर्दैवी मृत्यू झालेली आहे. त्यातून सावरून देश सेवा करायची त्याच्या मनात प्रचंड जिद्द होती. त्यामुळे करण हा दोन दिवसापासून औरंगाबाद येथे चालू असलेल्या अग्निपथ सैन्य भरतीमध्ये तीन फेरी उत्तीर्ण होऊन चौथ्या फेरीसाठी तो धावत होता. त्यात अचानक त्याला चक्कर आली आणि तो खाली पडला. त्याला तात्काळ शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले परंतु तो वाचू शकला नाही त्याचा दुर्दैवी मृत्यू (शहीद) दि.18/08/2022 रोजी झालेला आहे.



त्याची आई नसून लहान भाऊ आणि वडील आहे. घरची परिस्थिती हलाखीची म्हणून कन्नड तालुक्याचे युवा नेतृत्व तथा सामाजिक कार्यकर्ता प्रा. लखन चव्हाण यांनी कॅबिनेट मंत्री संजय राठोड, संदीपान भुमरे, अब्दुल सत्तार यांच्याशी फोनवरून तात्काळ मदत जाहीर करावी म्हणून विनंती केलेली आहे.
त्याच बरोबर मुख्यमंत्री यांनासुध्दा मेलद्वारे माहिती दिलेली आहे. जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन विनंती करून आणि कन्नडचे आमदार यांनाही विधान भवनात तात्काळ प्रश्न मांडून मदत जाहीर करावे, असे सर्वच बाजूने प्रा.लखन चव्हाण यांनी मागणी करून त्या तरुणाच्या कुटुंबियांच्या मदतीसाठी सतत प्रयत्न करत आहे. सर्वांना विनंती करून सर्व माहिती देऊन जर या शहीदाला मदत येत्या चार दिवसात जाहीर झाली नाही तर हजारो तरूणांसोबत आंदोलन करून वाटेल त्या स्थरावर जाऊ पण या तरुणाला 15 ते 20 लाखांची मदत घोषित केल्याशिवाय स्वस्त बसणार नाही, असा इशारही प्रा.लखन चव्हाण यांनी दिला आहे.

# गझलदीप प्रतिष्ठानच्या वतीने गझलसंग्रह प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**मुर्तिजापूर :** सुप्रसिध्द गझलकारा निर्मला सोनी यांच्या "हा खेळ भावनांचा" या दर्जेदार गझलसंग्रहाचा प्रकाशन सोहळा व त्यानिमित्त बहारदार मराठी गझल मुशायरा येथील गझलदीप प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. दि.२१ ऑगस्ट २०२२ ला राधामंगलम हॉल येथे दुपारी १२:०० ते ४:०० या वेळेत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.
प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार प्रा. अविनाश बेलाडकर तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक, अष्टपैलू कलावंत किशोर बळी, प्रा.डॉ.माधुरी पाटील, रवींद्र जवादे, संदीप वाकोडे, कैलास सोळंके उपस्थित राहतील. यानिमित्ताने संपन्न होणाऱ्या बहारदार मराठी गझल मुशायऱ्याच्या अध्यक्षस्थानी अमोल शिरसाट असतील.

मुशायऱ्यामध्ये नारायण सुरंदसे, संदीप वाकोडे, निलेश कवडे, सतिशसिंह मालवे, निर्मला सोनी, सुनिता इंगळे, मिलिंद इंगळे, बाळू बेलखेडे, शरद काळे, अविनाश येलकर, मंगेश गजभिये, प्रवीण हटकर, मिलिंद हिवराळे, प्रियंका गिरी, नितीन चुडे, अमोल गोंडचवर, सुनील ठाकूर हे सहभाग घेतील.
कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा.प्रमोद राजंदेकर, मिलिंद इंगळे, सुनील डोंगरदिवे, प्रमोद पंत, सुनील ढोकणे, सतीश खरात, विलास वानखडे, प्रा.गजानन वरघट, रवी गोंडकार, निलिमा आष्टीकर यांनी केले आहे.



# सावळदबारा येथे श्रीकृष्ण अवतार दिनाच्या निमित्ताने श्रीकृष्णाचा पालखी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील परब्रम्ह परमेश्वर अवतार श्रीकृष्णाचा जन्म मथुरा मथे साडेपाच हजार वर्षे झाला आहे. म्हणून आजही सपूर्ण जगात श्रीकृष्ण दि अवतार श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात येतो. तोच श्रीकृष्ण अवतार दिन म्हणून भगवान श्री चक्रधर स्वामी मंदीरावर दि.18/8/22 गुरुवार रोजी श्रीकृष्ण अवतार दिनाच्या निमित्ताने श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. गेले दोन वर्षापासून सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रम कोरोनाच्या महामारी बंदच होते. परंतु यंदा प्रशासनाने स्थिरता दिल्याने सुरुवात झाली आहे.
या पार्श्वभूमीवर चक्रधर स्वामी मंदीरावर दि.१८/८/२२ रोजी "मेरे चक्रधर मेरे श्याम" महानुभाव पंथीय भजनसंध्या विशाल जोगदेव यांच्या अमृतवाणीतून संगीतमय कार्यक्रम संपन्न झाला व रात्री बारा वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला. दि.19 शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता दरवर्षी प्रमाणे श्रीकृष्ण जन्मोत्सव निमित्त श्रीकृष्णाची पालखीची भव्य मिरवणूक दुपारी 4:00 वाजता काढण्यात आली. चौका चौकात महिलांनी रांगोळ्या काढून चौक सजविण्यात आले होते. पालखीचे दर्शनासाठी पुरुषा पेक्षा महिलांनी गर्दी केली होती. श्रीकृष्णाच्या जय जयकाराने सावळदबारा नगरी दुमदुमून गेली होती. श्रीच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीची पालखी मंदीरावर वापस आल्यावर सायंकाळी सात वाजता चक्रधर स्वामी मंदीराजवळ दहीहंडी उत्सव मोठ्या थाटामाटात पार पडून प्रसाद वाटप करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली आणि दुपारी बारा ते तीन वाजेपर्यंत गोपाळकाल्याचे निमित्ताने महाप्रसादचा कार्यक्रम झाला. असे पण आयोजक मधुकर पुजारी यांनी ही माहिती गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना दिली आहे. 19 ऑगस्ट राज्यात सर्वत्र दहीहंडीची जोरदार तयारी सुरु होती. सावळदबारा "गोविंदा आला रे" या गोविंदा पथकांनी जोरदार तयारी सुरु करून ईनाम पटकविला. प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.
या श्रीकृष्ण अवतार दिनाच्या म्हणजे "श्रीकृष्ण जन्मोत्सव" उत्सवाला, दहीहंडी व मिरवणूकीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून फर्दापूर पोलीस स्टेशनचे सपोनि देवीदास बाळासाहेब वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सावळदबारा बिट जमादार मिरखाँ तडवी यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. याप्रसंगी प्रा.जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते), प्रदीप चव्हाण भाजपा उपाध्यक्ष, उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान, डॉ. विठ्ठल कोते, डॉ. जफर सय्यद, अरुण नप्ते, दिपक गावडे, आयोजक मधुकर पुजारी, पुजारी मंडळी, गावातील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रिएटिव्ह नाईट चेस अकॅडमीचे २५ ला उद्घाटन

## ग्रँडमास्टर प्रविण ठिपसे, शिक्षणतज्ज्ञ केदार सोनी यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** भारतीय प्राचीन परंपरेतील बुद्धिबळ या खेळाचा प्रसारआणि प्रचार करण्याच्या मुख्य उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या क्रिएटिव्ह नाईट चेस अकॅडमीचे उदघाटन गुरुवार दि. २५ ऑगस्ट रोजी जागतिक दर्जाचे बुद्धिबळ खेळाडू ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे यांच्या हस्ते होत आहे. डोंबिवलीतील संगीतावाडी परिसरातील शांतीनगर येथे सकाळी अकरा वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणतज्ञ आणि अभिनव विद्यालयाचे संचालक केदार सोनी हे उपस्थित राहणार आहेत. सदरील अकॅडमी व सेन्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना देणाऱ्या बुद्धिबळ या खेळाचे प्रशिक्षण देण्यासोबत, खेळाडू घडवणे, विविध स्तरावर स्पर्धांचे आयोजन करण्याचा मानस अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक अभिषेक देशपांडे यांनी व्यक्त केला आहे. नवोदित खेळाडूंना बुद्धिबळ



क्रीडाक्षेत्रात प्रशिक्षित करणे, अनेक मुलां-मुलींना राज्य व राष्ट्रीय स्पर्धेत यश मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन, तसेच अनेक मोठया स्पर्धा आयोजित करून खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य क्रिएटिव्ह चेस अकॅडमी व डायनामिक चेस सेंटर करीत आहे.
सदरील कार्यक्रम गुरुवार दि.२५ ऑगस्ट २२ रोजी ८ वा मजला टेरेस, गजानन हाइट्स, शांतीनगर, संगीतावाडी, डोंबिवली पूर्व येथे होणार आहे.




# संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालय देव्हारी येथे दहीहंडी उत्साहाने साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालय देव्हारी येथे दही हंडी उत्साहाने साजरी एका नव्या आयुष्याची सुरुवात उत्साहाने करु, असा संकल्प सर्व विद्यार्थी व शिक्षक सर्वांनी केला आहे. व्यसन मुक्तीचा एकच नारा... आयुष्यात व्यसनाला नका देवू थारा. अशा घोषणा देत संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालय देव्हारी येथे दहीहंडी फोडण्यात आली. व्यसन सोडा फुलेल जीवन, नशा छोडो बोतल तोडो, व्यसनमुक्त समाज घडवूया आनंददायी जीवन जगूया... अशा आशयाचे फलक दहीहंडीला लावण्यात आले होते. सेवालाल नागरी मध्ये एका नव्या आयुष्याची सुरुवात उत्साहाने करु, असा संकल्प सर्वांनी केला.
संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालय देव्हारीचे मुख्याध्यापक पाटील यांच्या संकल्पनेतून या दहीहंडी चे आयोजन करण्यात आले होते. यासाठी पी.एच., टी.एम., जाधव, जीवन, विकास यांच्या पुढाकाराने हा उपक्रम पार पडला. पी.एच.म्हणाले, कोणत्याही प्रकारची नशा न करता देखील सण-उत्सवांचा आनंद घेता येतो. व्यसनाधिन तरुणांमध्ये सकारात्मक उर्जा निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. व्यसनमुक्तीची दहीहंडी फोडून व्यसनांमुळे काय अपाय होतात, त्याचे दुष्परिणाम काय आहेत, हे समाजाला यामाध्यमातून सांगण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



# आजादी का अमृत महोत्सवानिमित्त रेडरीबीन क्लबचा वतीने एचआयव्ही एड्स जनजागृती व युवा मानवी साखळीचे सादरीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना व रेडरीबीन क्लब विभागामार्फत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त घर घर तिरंगा झेंडा अभियानांतर्गत युवा मानवी साखळी व एचआयव्ही एड्स जनजागृती कार्यक्रम तसेच, आजादी की देशभक्ती गीते या विषयावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.
उपक्रमाची सुरुवात स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रकाश थारकर यांनी केली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के यांचीही उपस्थिती होती. तसेच याप्रसंगी मार्गदर्शन धनराज पवार, प्रदीप जिरे, डॉ राजकुमार गवळे, विश्वास लवंद, रेखा घाटे, ताठे, भीमा कांबळे ई. गुरजनांची उपस्थिती होती. तसेच NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.किरण चक्रे यांनी सूत्र संचलन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. थाटकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर एचआयव्ही एड्स या आजाराबद्दल प्रमुख मार्गदर्शक धनराज पवार यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. शिवाय प्रदिप जिरे आणि राजकुमार गवळी यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी स्वतः ची एचआयव्ही तपासणी करुन घेतली आणि विवाह पुर्वी एचआयव्ही तपासणी करुन लग्न करण्याची शपथ ही घेतली.
प्रा.डॉ.सोनवणे, प्रा.डॉ.गायत्री गाडेकर हे उपस्थित होते. यावेळी नाट्यशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ.प्रा.संपदा कुलकर्णी यांच्या टीमच्या विद्यार्थ्यांनी देशभक्ती पर गीतांवर डान्स सादर केला आणि यावेळी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.गायत्री गाडेकर यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व विधर्थी आणि सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# अंतूर किल्ल्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाचे पितळ उघडे..!

## निकृष्ट कामाची चौकशी करून तटबंदीच्या कामाला त्वरित करण्याची सह्याद्री प्रतिष्ठानची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**पिशोर :** तालुक्यातील महामनी काळातील नागापुर येथील ऐतिहासिक किल्ले अंतूरची तटबंदी सतत सुरू असलेल्या पावसामुळे ढासळली आहे. विशेष म्हणजे या किल्ल्याच्या डागडुजीवर चार कोटी रुपये खर्च करण्यात आले, तरीही हो तटबंदी वासळल्याने दुर्गप्रेमींनी संताप व्यक्त केला असून याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी पर्यटनप्रेमींसह सह्याद्री प्रतिष्ठानच्या सदस्यांनी केली आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी किल्ल्या खालोखाल रचनात्मक सौदयनि अंतुर किल्ला नटलेला आहे. ऐतिहासिक ठेवण्याकडे पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष झालेले आहे. सध्या तालुक्यात संततधार भिजत पाऊस पडत आहे. या पावसाचा फटका ऐतिहासिक गडकिल्ल्यांनाही बसू लागला आहे. त्यातच पुरातत्त्व खात्याचे उदासीन धोरण व दुर्लक्षामुळे हा ऐतिहासिक राज्य शासन संरक्षित वारसा धोक्यात आला आहे. २०१७ मध्ये किल्ले अंतुरच्या डागडुजीसाठी चार कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. सदरील काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. त्यामुळे हे सुशोभीकरण एक दोन वर्षांपुरतेच सुस्थितीत राहू शकले. सततच्या पावसामुळे या बांधकामातील पितळ उघडे पडले आहे. पहिल्या प्रवेशद्वारासमोरोल रस्ता दोन वर्षांपूर्वी खचला होता. तो अद्यापही दुरुस्त करण्यात आला नाही. येथून जीव मुठीत घेऊन पुढे पायी जावे लागते. किल्ल्याच्या दुसऱ्या प्रवेशद्वारावरील बुरुज तटबंदीचा भाग बासळला आहे. तसेच बालेकिल्ल्यावरील मलिक अंबरने बांधलेल्या तलावालगतच्या चा भाग हा दुसऱ्यांदा कोसळला आहे. तर किल्ल्याच्या पूर्व बाजूची भव्य तटबंदी पंधरा ते वीस फूट



अंतूर किल्याचे काम लवकर सुरु करू; जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांची माहिती

लांबपर्यंत ढासळला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेल्या या बांधकामाचा काही भाग दोन वर्षात दुसऱ्यांदा ढासळतोच कसा असा प्रश्न प्रिमींनी उपस्थित केला आहे.

**शासनाच्या उदासीन ढोरनामुळे किल्ल्यावरील अस्वच्छता...**

यामुळे किल्ल्यावरील प्रदूषण वाढत असून किल्ल्याच्या संरक्षणासाठी येथे कंत्राटी सुरक्षारक्षक नेमलेला आहे. परंतु काही महिन्यांपासून त्यांचे वेतन थकले आहे. कन्नड, नागापूर ते किल्ले अंतूरपर्यंत जाणारा रस्त्याची ठिकठिकाणी चाळणी झाली असून, "खड्यात रस्ते की रस्त्यात खड्डु" अशी परिस्थिती झाली आहेत. या रस्त्याच्या दुरुस्तीकडेही प्रशासनाने काणा डोळा केला आहे. या प्रकाराबाबत पर्यटक, दुर्गप्रमींनी नाराजी व्यक्त करीत आहे. सदरील बांधकामाची चौकशी करून संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत टाकावे. वासळलेल्या वास्तूची तत्काळ दुरुस्ती करण्याची मागणी सह्याद्री प्रतिष्ठानचे मराठवाडा प्रशासक डॉ. पवन गिरी, अरुण थोरात, ॲड. राजेंद्र निकम, डॉ. संजय पाईकराव, शिवराज पाटील, जगदीश कंचार, विष्णू भंगारे, सचिन वाडेकर, आकाश बारगळ, इतिहास डॉ. जगदीश भेलोडे, डॉ. शिवाजी आदी दुर्गप्रमींनी केली आहे.

**काम आपण लवकरच सुरू करु : जिल्हाधिकारी**

कन्नड सह्याद्री प्रतिष्ठानचे दुर्ग सेवक कित्येक वर्षांपासून करत असलेले गडकिल्ले संवर्धनाचे काम वाखाणण्याजोगे आहे. गडकिल्ले संवर्धनासाठी प्रतिष्ठानला काही सहकार्य लागेल ते देऊ, किल्ले अंतुरच्या तटबंदीची जी पडझड झाली त्याचे काम आपण लवकरच सुरू करु असे आश्वासन जिल्हाधिकारी चव्हाण यांनी रविवारी (दि.१४) दिले. कन्नड महसूल विभाग, सह्याद्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा अंतर्गत गडकिल्ले व ऐतिहासिक वास्तू संवर्धन स्वराज्य महोत्सवांतर्गत स्वच्छता मोहिमप्रसंगी जिल्हाधिकारी चव्हाण हे बोलत होते. या मोहिमेसाठी ऐतिहासिक पितळखोरा लेणीची निवड करण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी जनार्धन विधाते, तहसीलदार संजय वारकड यांनी मनोगत व्यक्त केले. ही मोहीम जिल्हाधिकारी सुनील चव्हाण, तालुका कृषि अधिकारी बाळराजे मुळीक, मुख्याधिकारी नंदकुमार भोंबे, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे, नायब तहसीलदार हारून शेख, दिनेश राजपुत, एस.ए. घोडके, सत्यजित आव्हाड, तलाठी भदाणे, सह्याद्री प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष शिवराज पाटील, मराठवाडा प्रशासक डॉ. पवन गिरी, धैर्यशील केरे यांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वीपणे पार पडली. मोहिमेसाठी सह्याद्री प्रतिष्ठानचे जगदिश कंचार, अरुण थोरात, सचिन वाडेकर, सागर शेजुळ, महेश भिंगारे, आकाश बारगळ, सुशांत जाधव, किशोर मगर, आदित्य अकोलकर, अमोल घुगे, दिनेश दाभाडे, सतीश नहिरे, शिवा भोसले, अभिषेक चव्हाण, मनोज गुंजाळ, किशोर मगर, राम आढाव, लखन शिंदे, राजेंद्र सपकाळ, वैभव कतारे, मंगेश गायकवाड, अनिल ठाकरे या दुर्गसेवकांनी परिश्रम घेतले. तसेच अंतुर किल्याचे काम त्वरित सुरु करण्याबाबत सह्याद्री प्रतिष्ठानचे दुर्गसेवक यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन ही दिले आहे.

# कन्नड उपविभागीय अधिकारी कार्यालयातील वस्तुवर जप्तीची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील देवनळा येथील शेतकरी मच्छिद्र गवळी यांची शेती धरणात गेलेल्या शेतीचा मावेजा मिळाला नाही म्हणुन दिवानी न्यायालय औरंगाबाद यांच्या आदेशाने उपविभागीय अधिकारी कार्यालयातील वस्तुवर जप्तीची कारवाई करण्यात आली.

कन्नड तालुक्यातील देवनळा येथील शेतकरी मच्छिद्र गवळी यांची शेती धरणात गेल्यावर पहिला मोबदला सुमारे चार लाख रूपये मिळाले पण ते समाधानकारक नसल्याने गवळी दिवाणी न्यायालयात गेले व न्यायालयाने 46 लाख रुपये देण्याचा आदेश दिला मात्र त्या आदेशाला केराची टोपली दाखवली. कोर्टाचा अवमान झाल्याने न्यायालयाने उपविभागीय अधिकारी




कार्यालयाच्या वस्तु कन्नड न्यायालयचे मुख्य बेलीफ आशोक पाथ्रे व त्यांच्या टिमने जप्त केले.

# माय एसबीए पोर्टलचा लोकार्पण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** देशातील बेरोजगारी संपविण्याच्या दिशेने स्वावलंबी भारत अभियान व deAsra या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने तरुणांमध्ये उद्यमिता, नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे व त्यातील अडचणी दूर कश्या कराव्यात किवा यात येणाऱ्या अडचणी कशा दूर कराव्यात व त्यावर कशी मात करावी याचे मार्गदर्शन करण्यासाठी माय एसबीए - My SBA या पोर्टलचा लोकार्पण सोहळा पुण्यामध्ये रविवार दि.२१ ऑगस्ट २०२२ रोजी पर्सिस्टंट या प्रख्यात आयटी कंपनीच्या भगीरथ, देवांग मेहता सभागृह, सेनापति बापट रोड, पुणे येथे दुपारी 3 वाजता संपन्न होणार आहे, अशी माहिती स्वावलंबी भारत अभियानचे प्रांत समन्वयक मिलिंद देशपांडे व deAsra चे प्रकल्प प्रभारी आशिष पंडित व सेवावर्धिनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद कुलकर्णी यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

त्यांनी पुढे सांगितले की, deAsra फाऊंडेशन हे 2015 पासून तरुणांना उद्योजक व्हावे यासाठी प्रयत्न करत असून आजतागायत 1 लाख 70 हजारांपेक्षा अधिक लोकांना मार्गदशन व मदत केली आहे. फौंडेशनचे संस्थापक व चेअरमन डॉ. आनंद देशपांडे यांचे यासाठी प्रोत्साहन असते असे स्पष्ट केले. माय एसबीए या पोर्टलचे लोकार्पण भूपेंद्रसिंह यादव, केंद्रीय श्रम, पर्यावरण मंत्री भारत सरकार यांचे हस्ते होणार आहे. पर्सिस्टंटचे संस्थापक व चेअरमन डॉ. आनंद देशपांडे हेसुध्दा या कार्यक्रमात सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला स्वदेशी जागरण मंचाचे अखिल भारतीय संयोजक सुंदरम यांची प्रमुख उपस्थिती असेल. अन्य मान्यवरांमध्ये स्वदेशी जागरण मंचाचे राष्ट्रीय संघटन मंत्री कश्मिरीलाल, मंचाचे राष्ट्रीय सह संघटन मंत्री सतिशकुमार, भारतीय मजदूर संघाचे पूर्व राष्ट्रीय अध्यक्ष सजी नारायण उपस्थित राहणार असून विशेष अतिथी म्हणून अभियानाचे संरक्षक काडसिद्धेश्वरस्वामी महाराज अदृशस्वामीजी, कण्हेरी मठ असणार आहेत. या व्यतिरिक्त रा.स्व. संघाचे सह सरकार्यवाह डॉ. कृष्ण गोपाल, अभियानाचे संरक्षक डॉ.खा. नरेंद्र जाधव, रणजीतसिंग सोढी, अमूलचे कार्यकारी संचालक व श्रीधर वेम्बू, जोहो कार्पोरेशन, तेनकाशी तामिळनाडू हे दृकश्राव्य माध्यमाद्वारे संवाद साधणार आहेत.

स्वावलंबी भारत अभियानाचे राष्ट्रीय समन्वयक जितेंद्र गुप्त, राष्ट्रीय महिला समन्वयक श्रीमती अर्चना मीणा व हे पोर्टल तयार करण्यासाठी सहभाग देणारे डिजिटल टीमचे राधेय चोयलजी तसेच धर्मेंद्र दुबे उपस्थित राहतील. हा कार्यक्रम फेसबुक, ट्विटर व अन्य माध्यमातून जगभर प्रसारित करण्यात येणार आहे. पुणे शहरातील विविध मान्यवर तसेच अधिकारी, कारखानदार, व्यावसायिक व मोठ्या प्रमाणावर तरुण वर्ग उपस्थित राहून यात सहभागी होतील यासाठी प्रयत्न चालू आहे, अशी माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली. सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

**माय एसबीए - My SBA पोर्टलच्या लोकार्पणाच्या निमित्ताने पार्श्वभूमी**

आपल्या देशातील सर्वांसमोरची ज्वलंत समस्या काय यांचा शोध घेण्यासाठी २ वर्षांपूर्वी देशातील काही आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था यांची एक संयुक्तू बैठक झाली. त्यात निर्णय झाल्याप्रमाणे देशातील जवळपास ७० ते ८० प्रमुख पदाधिकारी यांनी देशातील सर्व स्तरातील लोकांशी संपर्क केला व त्यातून एक निष्कर्ष समोर आला की आज रोजी देशातील सर्वात मोठी समस्या "बेरोजगारी" ही आहे. प्रत्येक घरात या समस्येचा प्रभाव असून, देशातील सर्व राजकीय पक्ष, विविध संघटना यांच्या अजेंडयावर हा विषय आहे. त्यामुळे या विषयात काम करायचे निश्चिमत झाले व त्यादिशेने प्रत्येक संघटनेचा एक अखिल भारतीय पातळीवरील पदाधिकारी घेऊन त्याची एक केंद्रीय समन्वय समिति तयार करण्यात आली व त्याला अनुसरून प्रदेश व जिल्हा पातळीवर अश्या स्वरूपाचे काम करण्यासाठी समन्वयक व कार्यकर्ते यांची एक समिती तयार करण्यात आली. या नवीन कामाचे नाव स्वावलंबी भारत अभियान असे निश्चिरत करण्यात आहे.



# स्वातंत्र्यदिनी युवा भारूडरत्न शेखर निरंजन भाकरे यांनी केले समाजप्रबोधन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तहसीलदार विक्रम राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्लोड तहसील कार्यालयातर्फे तालुकाभर अनेक उपक्रम राबविण्यात आले. भारत सरकारच्या आदेशानुसार दि.13 ते 15 ऑगस्ट घरोघरी तिरंगा फडकवून नागरिकांनी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करावा तसेच घरोघरी तिरंगा ही मोहीम राबवताना नागरिकांकडून तिरंगा झेंड्याचा अवमान होणार नाही यासाठी दि.9 ते 15 ऑगस्ट तहसील कार्यालयामार्फत युवाभारुडरत्न शेखर निरंजन भाकरे यांनी भारुड तसेच देशभक्तीपर गीतांद्वारे नागरिकांची जनजागृती केली. बोरगाव बाजार, आमठाणा, निल्लोड, गोळेगाव, उंडणगांव, अजिंठा, शिवना, अन्वी, तहसील कार्यालय सिल्लोड, पंचायत समिती सिल्लोड या ठिकाणी जाऊन युवा भारूडरत्न शेखर निरंजन भाकरे यांनी वासुदेव नंदी बुरगुंडा अशा भारुडांद्वारे तसेच "भारत माते त्रिवार वंदन" या त्यांनी स्वतः रचलेल्या देशभक्तीपर गीताद्वारे समाज प्रबोधन करीत रसिकांची मने जिंकली.

ज्या देशवीरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. शहीद भगतसिंग सुखदेव राजगुरू हे देश विर फासावर चढले, अनेक देशवीरांनी आपलं रक्त सांडले, या स्वातंत्र्यात पुरुषांसोबत स्त्रिया ही लढल्या. झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले यांसारख्या स्त्रियासुद्धा त्या काळात लढल्या. म्हणून या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या देशवीरांबद्दल आपल्या डोळ्यात आठवणी साचल्या पाहिजेत त्यासाठी प्रत्येकाने हा अमृतमहोत्सव काहीतरी संकल्प घेऊन साजरा केला पाहिजे. तरुणांनी पूर्ण आयुष्य निर्व्यसनी जीवन जगण्याचा संकल्प घ्यावा, व्यसनी तरुणांनी निर्व्यसनी होण्याचा संकल्प घ्यावा, आई-वडिलांचा सांभाळ व्यवस्थित करण्याचा संकल्प घ्यावा, गुरुजनांचा व वडीलधाऱ्या माणसांचा आदर करण्याचा संकल्प घ्यावा, राष्ट्राचा विकास व माता, भगिनीचे रक्षण करण्याचा संकल्प घ्यावा, असे प्रबोधन युवा भारुडरत्न शेखर निरंजन भाकरे यांनी तालुकाभर केले. त्यावेळी त्यांच्या संचात शिवसिंह गोमलाडू, भगतसिंग ठाकूर, सागर सपकाळ, विष्णू गोडबोले आदी कलावंतांनी त्यांना साथ केली.

# कन्नड तालुक्यात पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी : संजय खंबायते

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुक्यातील शेतकरी गेल्या दोन वर्षांपासून अतिवृष्टीचा सामना करत आले आहेत. सध्या सतत झालेल्या पावसाने पिकांची वाढ खुंटली. पिकांचे तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भाजप जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते व सुभाष काळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांच्याकडे केली आहे.

जुलै महिन्यात सततच्या पावसाने शेतात गवत झाल्याने आंतरमशागतीचा खर्च वाढला. उष्ण तापमान न मिळाल्याने पिकांची वाढ खुंटली त्यामुळे महागडी कीटकनाशके फवारणी करण्याची वेळ आली. जिल्ह्यातील वैजापूर व सिल्लोड तालुक्यांत पंचनामे सुरू करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कन्नड तालुक्यात देखील पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, पंचनामे करताना कोणताच शेतकरी वंचित राहू नये, असे जिल्हाधिकारी यांना आदेशीत करण्यात यावे, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली.

# स्व.वसंतराव नाईक यांचे कार्य शेतकऱ्यांना प्रेरणादायी : जिल्हाधिकारी येडगे

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** माजी मुख्यमंत्री, हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांचे कार्य व विचार शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आणि राज्यातील नागरिकांसाठी अभिमानास्पद आहे, या प्रतिष्ठानचे कामही मोलाचे आहे असे गौरवोद्‌गार जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काढले. येथील बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय सभागृहात वसंतराव नाईक यांच्या ४३ व्या स्मृतिदिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, मी कराडचा आणि कराडमध्ये यशवंतराव चव्हाण स्मृतिदिनाच्या निमित्ताने कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे या स्मृतिदिनी कृषी प्रदर्शन आपण घेऊ शकतो. वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानचे कार्य संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. प्रतिष्ठानच्या वतीने तसे उपक्रम राबविले गेले पाहिजेत. त्यास जिल्हा प्रशासनाकडून सहकार्य होईल. कार्यक्रमात राज्यातील कर्तबगार शेतकऱ्यांचा कुटुंबासह सत्कार केला. या शेतकऱ्यांचा आदर्श घेऊन इथे जमलेल्या




शेकडो शेतकऱ्यांनी उपयोग करावा. आज शेतीकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. जुन्या शेतकऱ्यांच्या पारंपरिक ज्ञानामध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग करून पीक पद्धतीत बदल केले पाहिजे. माध्यमांद्वारे शेतीच्या नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळते त्याचाही उपयोग शेतकऱ्यांनी करावा, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

याप्रसंगी हवामानतज्ज्ञ पंजाब डख यांनी हवामानाचा अभ्यास यावर सविस्तर माहिती दिली. ते आपल्या अनुभवावरून पावसाचा अंदाज व्यक्त करतात. त्यांचा अंदाज महाराष्ट्रातील कोट्यवधी शेतकऱ्यांना उपयोगी पडतो. शेतकऱ्यांना हवामानाचे जे पारंपरिक ज्ञान असते त्याला शास्त्रीय आधार देऊन पावसाचा अंदाज व्यक्त करण्याची हातोटी डख यांना साधली आहे. प्रत्येकाने 'झाडे लावा, झाडे जगवा' हा उपक्रम राबविणे गरजेचे आहे. तापमान वाढल्याने हवामानाचे संतुलन बिघडते, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक आसेगावकर यांनी केले. कार्यक्रमात कर्तबगार शेतकरी प्रियदर्शनी विलास मानकर, संदीप घुले, आनंद शिंदे, दीपक पाटील, नितीन सावंत, अनूप मोरे, मिलिंद चाळके, देवराव कृषी समूह, प्रवीण गट्टाणी, अमोल बोडखे, जगदेव टेमकर, संत खप्ती शेतकरी पुरुष गट, मनोज माळी, हळद संशोधन केंद्र, डॉ. शिवाजी म्हेत्रे यांचा सहपरिवार सत्कार करण्यात आला. संचालन प्रा. संजय चव्हाण, प्रा. छाया कोकाटे यांनी केले. तर आभार प्रा. गोविंद फुके यांनी मानले.



अन्नक्षेत्र या संस्थेमार्फत अन्नाची नासाडी करु नये जेवढे लागेल तेवढेच घ्यावे या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. वैजापुर तालुक्यातील तलवाडा येथील जिल्हा परिषद शाळेत कॅटबरी चॉकलेट वाटप करण्यात आले. यावेळेस कुषी उत्पन्न बाजार समिती सभापती भागिनाथ मगर, चेअरमन राजेंद्र मगर, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, दादाभाऊ मगर, वसंत मगर, काकासाहेब मगर, तळेकर, पापा शेख आदी.

## जीपीएस प्रणालीची मदत, ट्रक भंगारमध्ये विकणाऱ्या सराईत चोरट्याला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जीपीएस प्रणालीमुळे गुन्हेशाखेने ट्रक चोराचा माग काढत त्याला काल १७ ऑगस्ट रोजी बेड्या ठोकल्या व पुढील कारवाईसाठी सिडको औद्योगिक पोलिसांच्या हवाली केले. लक्ष्मण बाबुराव गाडे (३९) रा. भिवंडी बोडखा ता.अंबड जि.जालना असे अटक आरोपीचे नाव आहे.

तो रेकॉर्डवरचा गुन्हेगार आहे. त्याच्या विरोधात जालना, औरंगाबाद, नाशिक या ठिकाणी गंभीर गुन्हे दाखल आहेत. गाडेने सिडको औद्योगिक परिसरातून एका महिन्यापूर्वी चोरलेला ट्रक कटरने तोडून भंगारमध्ये विक्री केल्याची कबुली गुन्हेशाखेला दिली.

एका महिन्यापूर्वी ट्रक चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर सिडको औद्योगिक पोलिसाप्रमाणे गुन्हेशाखाही चोरीचा तपास करत होती. गुन्हेशाखा पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांनी फिर्यादीकडून घेतलेल्या माहितीमध्ये चोरी गेलेल्या ट्रकमध्ये जीपीएस प्रणाली सुरु होती, असे निष्पन्न झाले. त्यानुसार ट्रक चोरीस गेल्यापासून जीपीएस प्रणाली बंद पडल्या ठिकाणापर्यंत माग काढला. त्या मार्गावरील सीसी टीव्हीही फुटेज तपासले तो भिवंडीबोडखा या परिसरापर्यंत निघाला. याच ठिकाणी भंगारमध्ये विकलेल्या ट्रकची जीपीएस यंत्रणा बंद पडली होती. त्यामुळे परिसरातील नागरिकांना हे फुटेज दाखवल्यानंतर त्यांनी हा ट्रक आरोपी लक्ष्मण गाडेने काही दिवसांपूर्वीच खरेदी केल्याचे सांगितले.

दरम्यान खबऱ्याने माहिती दिली की, आरोपी गाडे हा जालना एमआयडीसीमध्ये भंगारमध्ये विक्री केलेल्या कालिका स्टील कंपनीजवळ आला हे त्याला पीएसआय अजित दगडखैर व पीएसआय सोनटक्के यांनी ताब्यात घेत चौकशी केली असता त्याने सिडको औद्योगिक परिसरातून ट्रक चोरी करत तो शेतात नेत कतारने कापून कालिका स्टील या कंपनीला विक्री केल्याची कबुली दिली. वरील कारवाई पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता व पोलीस उपायुक्त अपर्णा गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पुढील तपास पोलीस निरीक्षक विठ्ठल पोटे करत आहेत.

## मीटर रीडिंग एजन्सीजवर कारवाईचा बडगा, अचूक बिलांचे प्रमाण वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मीटर रीडिंगध्ये हयगय करणाऱ्या एजन्सीजच्या कामांचे मूल्यांकन करीत त्यांच्यावर धडक कारवाईचा बडगा उगारताच अस्पष्ट फोटोचे प्रमाण ४५ टक्क्यांवरून ३ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात महावितरणला यश आले आहे.

चुकीच्या वीजबिलांमुळे ग्राहकांना होणारा नाहक मनःस्ताप व वीजबिल दुरुस्तीच्या त्रासासोबतच महावितरणच्या महसुलाचे नुकसान लक्षात घेत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी राबविलेल्या विशेष प्रयत्नांमुळे महावितरणच्या वीजबिलांतील अचूकता मोठ्या प्रमाणात वाढली असून एप्रिल ते जून २०२२ या ३ महिन्यांत वीज विक्रीतही तब्बल ३ टक्क्यांनी (८२५ दशलक्ष युनिट) वाढ झाली आहे.

उत्कृष्ट ग्राहकसेवा व महसूल यांना महावितरणचे सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत वीजमीटरचे रीडिंग अचूकच झाले पाहिजे यासाठी महावितरणने विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनात अतिशय गांभीर्याने धडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. अचूक रीडिंगसाठी सुधारणा न करणे, वीजमीटर योग्य स्थितीत असूनही हेतुपुरस्सरपणे नादुरुस्तीचा (फॉल्टी) शेरा देणे, सरासरी किंवा चुकीचे रीडिंग घेणे याप्रकारे मीटर रीडिंगमध्ये हयगय करणाऱ्या मीटर रीडिंग एजन्सीविरुद्ध तसेच महावितरणच्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईचा धडाका सुरू करीत राज्यातील तब्बल ७६ मीटर रीडिंग एजन्सींजना बडतर्फ करण्यात आले. तसेच



महावितरणच्या ४१ अभियंत्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. महावितरणकडून प्रामुख्याने उत्कृष्ट ग्राहकसेवा व महसूलवाढीसह सक्षमतेचा, प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी आमुलाग्र सुधारणा सुरू आहेत. त्यात कोणतीही तडजोड होणार नाही. ग्राहकांनी प्रत्यक्षात वापरलेल्या विजेचे अचूक बिल देणे ही महावितरणची जबाबदारी आहे. परंतु सदोष व चुकीच्या रीडिंगमुळे ग्राहकांचा रोष वाढतो. त्यामुळे अचूक बिलिंगसाठी १०० टक्के अचूक रीडिंग हे महावितरणचे लक्ष्य आहे. त्यासाठी सुरू असलेल्या उपायांमुळे बिलिंग व रीडिंगमध्ये मोठी सुधारणा झाली आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण कमी झाले आहे. मीटर रीडिंग हे अचूक व गुणवत्तेनुसार होईल यासाठी कायम काळजी घेण्यात येईल. तसेच वारंवार सूचना देऊनही एजन्सीजने रीडिंगमधील हेतुपुरस्सर चुका किंवा सततचे दोष टाळले नाही तर एजन्सीजविरुद्ध बडतर्फी व काळ्या यादीत टाकण्यासह प्रसंगी फौजदारी कारवाई करण्याची समज देखील या एजन्सींजना देण्यात आली आहे.

अचुक मीटर रिडींगमुळे महावितरणच्या महसुलासोबतच वीज वितरण हानीत देखील मोठ्या प्रमाणात घट होत असल्याने त्याचा प्रत्यक्ष लाभ थेट वीज ग्राहकांना होणार असून वीजहानीपोटी त्यांना बसणारा आर्थिक भुर्दंड देखील कमी होणार आहे. याशिवाय वीज बिलासंदर्भात ग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाणे येथे स्वातंत्र्य अमृत महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** 15 ऑगस्ट या दिवशी स्वातंत्र्य अमृत महोत्सवानिमित्त गावामध्ये प्रभात फेरी काढण्यात आली. त्यावेळी गावांमधील सर्व मान्यवर उपस्थित होते. शाळेमध्ये संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या त्यावेळेस विजेता झालेल्या विद्यार्थ्यांना नवभारत फर्टिलायजर्स लिमिटेड औरंगाबादकडून बक्षीस वाटप करण्यात आले व तसेच गावांमधील शेतकऱ्यांना जैविक शेती विषयी नवभारत फर्टिलायजर्स लिमिटेड कंपनीचे अधिकारी उमेश निकस यांनी रासायनिक शेतीमुळे होणारी जमिनीची नुकसान खूप होत आहे. आजची जमीन ही रासायनिक खते जास्त वापरून नापीक झाली आहे. त्यामुळेच जैविक शेती ही काळाची गरज आहे.

त्यानंतर उपस्थित असलेले अधिकारी गोपाल लाळगे, श्रीकांत मगर यांनी सांगितले की, येणाऱ्या काळामध्ये जैविक व सेंद्रिय शेती करणे आवश्यक असून आतापासून शेतकऱ्यांनी जैविक शेतीकडे वळावे. यासाठी लागणारी आवश्यक मार्गदर्शन कंपनीतर्फे निशुल्क पुरवले जाईल. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक लोटन माळी, शिक्षक वर्ग, अंगणवाडी सेविका, तसेच गावातील शेतकरी व कंपनीचे अधिकारी अतुल जाधव, इंद्रसिंग कच्छवा, मनोज पाटील इत्यादी उपस्थित होते.

## गणेशोत्सवासाठी शहर पोलिस विभागाला अतिरिक्त मनुष्यबळाची गरज

### अतिरिक्त पोलिस महासंचालक संजय कुमार यांनी घेतला आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राज्यात गणेशोत्सव सण आगामी काही दिवसात साजरे केले जाणार आहे. या गणेशोत्सवासाठी औरंगाबाद शहर पोलिस विभागाने केलेल्या तयारीचा आढावा अतिरिक्त पोलिस महासंचालक संजय कुमार यांनी घेतला. पंधरा सुत्री कार्यक्रमावर भर देण्याच्या सुचना त्यांनी केले. यावेळी पोलिस आयुक्त डॉ. निखील गुप्ता यांनी गणेशोत्सवासाठी अतिरिक्त पोलिस बंदोबस्ताबाबत प्रस्ताव सादर केला.

राज्य पोलिस दलात प्रशिक्षक व विशेष पथक अतिरिक्त पोलिस महासंचालक संजय कुमार यांनी गुरूवारी (१८ ऑगस्ट) औरंगाबाद पोलिस आयुक्तालयाला भेट दिली. यावेळी पोलिस



विभागाकडून त्यांना सलामी देण्यात आली. यानंतर शहर पोलिस आयुक्तालयात पोलिस आयुक्त डॉ. निखील गुप्ता यांच्यासह अन्य पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत आगामी गणेशोत्सवाच्या तयारीबाबत आढावा त्यांनी घेतला. या आढावा बैठकीत संजय कुमार यांनी पोलिस विभागाला काही सुचना केली. तसेच सामाजिक सलोखा राखुन गणेशोत्सव साजरा करावा. तसेच कोणताही अनुचित प्रकार होऊ नये. याची काळजी घ्यावी. गुन्हेगारी वृत्तीचे तसेच पाहिजे असलेल्या गुन्हेगारांना ताब्यात घेण्याच्या सुचना त्यांनी यावेळी केल्या असल्याची माहिती पोलिस आयुक्त डॉ. गुप्ता यांनी दिली. पोलिस आयुक्त डॉ. गुप्ता यांनी मिरवणूक मार्ग, तसेच पोलिस तयारीबाबत विस्तृत माहिती अतिरिक्त महासंचालक यांना दिली. यावेळी शहर पोलिस विभागाने अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली आहे. यात दोन पोलिस उपायुक्त, ३ सहायक पोलिस आयुक्त, पोलिस निरिक्षक १०, पोलिस अंमलदार ३०० ते ४०० आणि होमगार्ड ५०० यासह चार एसआरपीएफच्या तुकडी असा वाढीव बंदोबस्त देण्याचा प्रस्ताव अतिरिक्त पोलिस महासंचालक यांच्याकडे देण्यात आला आहे.

**एक मंडळ एक पोलीसाचे नियोजन**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीत एक पोलिस एक मंडळ हा नवीन प्रयोग राबविण्यात आला. शहरात वर्ष २०१९ मध्ये ८५० सार्वजनिक गणेश मंडळ नोंदणीकृत होते. याशिवाय छोट्या गणेशमंडळाची संख्या अधिक आहे. याचा विचार करून शक्य असल्यास एक मंडळ एक पोलिस किंवा पाच ते सहा मंडळ एक पोलिस ही संकल्पना राबविण्याचे नियोजन असल्याची माहिती पोलिस आयुक्त डॉ. गुप्ता यांनी दिली.

**सोसायटीसह छोट्या मंडळाने नोंदणी करण्याचे आवाहन**

पोलिस विभाग आणि महानगर पालिका यांच्या संयुक्त विदयमाने यंदा ऑनलाइन गणेश मंडळाची नोंदणी करण्यात येणार आहे. या नोंदणी प्रक्रियेत सोसायटी आणि छोट्या गणेश मंडळानेही नोंदणी करावी. किंवा संबंधीत पोलिस ठाण्यात गणेश मंडळाबाबत माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस आयुक्त डॉ. निखील गुप्ता यांनी केले.

# ध्येयवेड्या सेवाधर्मी उद्धव बापू यांचा प्रशासनाकडून सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** गेल्या वर्षभरात आझादी का अमृतमहोत्सव कालावधीत जिल्हाभर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले यात विशेष योगदान दिल्याबद्दल निवेदक संवादतज्ञ उध्दव फड यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

वर्षभर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने संधी दिली व समिती सदस्य म्हणून वेळोवेळी प्रत्येक कार्यक्रमाच्या नियोजनात सहभाग व प्रत्येक कार्यक्रमाचे उत्कृष्टपणे सुत्रसंचलन केली. तसेच आझादी का अमृतमहोत्सव निमित्ताने सामाजिक दायित्व समजून वर्षभरात संवादतज्ञ उध्दव बापू फड यांनी प्रबोधनात्मक विविध विषयांवर 75 सामाजिक लेख व 75 ग्रामशक्तीतुन राष्ट्रभक्ती यावर जिल्हा भर व्याख्यान केले. व गावागावात प्रबोधन केले.

लातूर जिल्ह्यातील पाणी व स्वच्छता चळवळ घराघरात पोहचवणारे पाण्यासारखाच पारदर्शी, ग्रामीण भारताच्या मुलभुत विकासाच्या मुळा जिवंत करु पाहणारा अभ्यासु, ध्येय वेडा माणूस म्हणून तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध वक्ता, सरस्वती प्रसन्न शब्दपंढरीचा वारकरी, लोकप्रिय निवेदक, हाडाचा



पत्रकार, प्राध्यापक, जनसंपर्क तज्ञ, उत्तम संघटक, संत साहित्याचे अभ्यासक, महाराष्ट्र शासनाच्या प्रबोधन दिंडीचे 10 वर्षांपासून प्रमुख असलेले अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, प्रबोधनकार प्रवचनकार, संवादतज्ञ उध्दव बापु फड या ध्येयवेड्या माणसाचा सन्मान केला. पुरस्कारासाठी काम न करणारा माणूस, दिलेलं काम मनापासून करत राहणारा, तुकोबा गाडगेबाबा यांचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम करणारा कर्मयोगी सेवावृत्तीचा माणूस म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आपण नेहमी अनेकांनी मंत्र दिले त्याचा धागा पकडून सदैव गावपातळीवर 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' म्हणत जय स्वच्छता जय जलज्ञान ! हा नारा अखंड देत असणारा माणूस यांचा सन्मान केला. याबद्दल प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभु जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, प्रकल्प संचालक किशोर काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ वडगावे, जिल्हा वित्त व लेखा अधिकारी डॉ. रन्तराज जवळगेकर, क्रिडा अधिकारी लिकडे, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, पशुसंवर्धन अधिकारी पडिले, कृषी अधिकारी चोले आदींनी अभिनंदन केले.

# सहकार चळवळ मजबूत करणे काळाची गरज

## राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांचे मत



**पश्चिम महाराष्ट्र सहकारी संचालक मंडळाच्या सत्कार कार्यक्रमात मार्गदर्शन करताना राज्य पत सस्थेचे अध्यक्ष काका कोयटे. व्यासपीठावर राज्य सहकारी महासंघाचेअध्यक्ष डॉ प्रताप पाटील, उपाध्यक्ष सत्कार साहेब, सहकार मंडळाचे मानद सचिव ॲडव्होकट समीर सोनावणे आदी.**

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** सहकार चळवळ मजबूत करणे ही काळाची गरज आहे, त्यासाठी मनभेद विसरून सर्व सहकारी संस्थांनी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन विकासाची दिशा महाराष्ट्राला दिली पाहिजे, असे परखड मत राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी व्यक्त केले.

पश्चिम महाराष्ट्र सहकारी बोर्डाचे संचालक मंडळाची बैठक शिर्डी या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना काकासाहेब कोयटे यांनी सहकार चळवळी संदर्भात आपले मत व्यक्त करताना वरील विचार व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य सहकारी महासंघाचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर प्रताप पाटील हे होते.

शिर्डी येथे पश्चिम महाराष्ट्र सहकारी मंडळाची वार्षिक बैठक आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीत पश्चिम महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संचालक मंडळ आणि सदस्य उपस्थित होते. यावेळी यावेळी राज्य महासंघाचे उपाध्यक्ष सतकर साहेब, कोल्हापूर तसेच मंडळाचे मानस सचिव एडवोकेट समीर सोनवणे व्यासपीठावर उपस्थित होते.

आपल्या भाषणात सविस्तर मार्गदर्शन करताना काकासाहेब कोयटेपुढे म्हणाले की सहकारी संस्था निर्माण करताना किंवा सदस्यांना कर्ज वितरण करताना किंवा सहकाराच्या माध्यमातून इतर व्यवहार करताना आदर्श आचारसंहितेची गरज आहे. या माध्यमातून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना किंवा सदस्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. कर्ज घेणे कर्जाचा उपयोग करणे, कर्जाची परतफेड करणे यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रशिक्षण घेणे ही काळाची गरज आहे हे स्पष्ट करताना काकासाहेब कोयटे यांनी इंडोनेशिया, नेपाळ आदी सहकाराशी संबंधित कायद्यांचा कार्यशैलींचा उदाहरणासह स्पष्टीकरण केले.

सहकार चळवळ या धर्तीवरच सहकार चळवळ गुणात्मक दृष्टिकोनातून विस्तारित झाली तर खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास सहज साध्य होऊ शकतो असे प्रभावीपणे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉक्टर प्रताप पाटील यांनी सहकार चळवळ ही आर्थिक दृष्टिकोनातून सद्यस्थितीत कमजोर झाली आहे. संस्थात्मक स्तरावर आणि शासन स्तरावर योग्य ते धोरण ठरवून सहकारी चळवळ सक्षम करणे गरजेचे आहे. सहकार चळवळीचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेले आहे, त्यासाठी सहकार विद्यापीठ निर्माण करून  चळवळीला भविष्याच्या दृष्टिकोनातून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने आणि विज्ञानाच्या साह्याने मजबूत करता येईल, असे मत प्राचार्य डॉक्टर प्रताप पाटील यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी उपस्थित असलेल्या सर्व संचालकांचा माननीय काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते सद्गुरु साईंची प्रतिमा व शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सहकार चळवळीत श्रद्धा आणि सबुरी हे सद्गुरु साईंचे विचार ही चळवळीला  नवी दिशा देण्यास दिशादर्शक ठरतील, असे मत त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले.

याप्रसंगी कोल्हापूर सांगली सातारा सिंधुदुर्ग पुणे जळगाव धुळे अहमदनगर यासह अनेक जिल्ह्यांचे संचालक मंडळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पश्चिम महाराष्ट्र सहकार मंडळाचे संचालक माननीय प्राचार्य डॉक्टर गणी पटेल केले तर मंडळाचे मानस सचिव एडवोकेट समीर सोनवणे यांनी आभार व्यक्त केले.

याप्रसंगी सिकंदर पटेल, माननीय नाना शेळके आदीनी संचालक मंडळांचा सत्कार केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हुल्लाळकर, संदीप आडमुठे, ऐनापुरे, उदयसिंह राजपूत, शरद गुरव आदींनी परिश्रम घेतले.

# प्रथमेश संगीत साधना केंद्राच्या विद्यार्थ्यांकडून 'ये देश है वीर जवानों का...'चे सादरीकरण



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रथमेश संगीत साधना केंद्राच्या विद्यार्थ्यांनी स्वर प्रथम प्रस्तुत ये देश है वीर जवानों का... हा देशभक्ती गीतांचा सोहळा साजरा केला. या कार्यक्रमाला खरे खुरे जवान प्रमुख अतिथी म्हणून लाभले. कॅप्टन परशुराम बाचेवाड, अशोक हंगे, रोकडे, मोहन सोन्नेकर, साहेबराव नेटके या माजी सैनिकांचे मार्गदर्शन व अनुभव लाभले. सैनिकांच्या अनुभव कथनाने अंगावर शहारे आले. सर्वांनी अतिशय समर्पक असे मार्गदर्शन केले व आपल्यातील सुप्त भावना व्यक्त केल्या.

यावेळी कॅप्टन श्री बाचेवाड यांनी मेरा मुल्क मेरा देश हे गीत मुक्त कंठाने गायले. सारे केंद्र भारतमाताच्या जयघोषाने कित्येकदा निनादले व कित्येकवेळेस अश्रूही आले. संजय महाजन यांनी गायलेल्या 'ये देश है वीर जवनों का' या गाण्याने सारेच जण भारावून गेले. उमेश जोशी यांच्या 'ये मेरे वतन के लोगों' या गीताने उपस्थित भावनाविवश झाले, लतादीदीचे स्मरणही झाले. सावरकरांच्या जयोस्तुते गीताने प्रथमेश व नंदिनी यांनी सर्वांना देशभक्ती गीतावर गायला भाग पाडेल इतका सुंदर ठेका धरला. ऋषभ कुलकर्णी व प्रथमेश महाजन यांनी सादर केलेले  संदेसे आते है... या गाण्याने डोळ्यात पाणी आले, सर्वांगावर शहारे आली.

तर प्रथमेश संगित साधना केंद्राच्या विद्यार्थ्यांनी गिटार वरती वंदे मातरम् गीत सादर केलं.  यामध्ये अनुष्का मोखाडे, समेद ढोले, अमोघ केराळकर, पार्थ रेवळकर,अवनीश कुलकर्णी, ओंकार रेड्डी यांचा सहभाग होता.

तत्पूर्वी सर्व सैनिकांचे आगमन होताच उपस्थितांनी भारतमाता की जय, वंदे मातरम च्या घोषणा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन करून झाली. उपस्थितांना तिरंगाचे बॅज लावून देशभक्ती जागृत केली. एकंदरीत अमृत महोत्सवा अमृतमय झाला.

निवेदन सुहास महाजन यांनी केले.



# हिंदी भाषिक नवलेखक शिबिराचे उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील मराठवाडा लिगल अ‍ॅण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीचे डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालयात केंद्रिय हिंदी संचालनालय, शिक्षण मंत्रालय (उच्च शिक्षण) भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या वतीने अनुदान प्राप्त, हिंदी नवलेखक शिबीराचे उद्‌घाटन दि. १७ ऑगस्ट २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. माधवजी सोनटक्के यांच्या हस्ते झाले.

उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा लिगल अ‍ॅण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव मा. अ‍ॅड. श्री. धनंजय कुलकर्णी होते. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित, हिंदी विभाग प्रमुख डॉ. रमा दुधमांडे केंद्रिय हिंदी संचालनालयाच्या वतीने शिबीर प्रभारी म्हणून आलेले मा.डॉ.श्री. नत्थुलालजी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शन व उद्‌घाटक मा. डॉ. श्री. माधवजी सोनटक्के यांनी नवलेखकांना मार्गदर्शन करताना दर्जेदार लेखनासाठी प्रतिभा, बहुश्रुतता व अभ्यास या तीन गुणांचे महत्व उदाहरणासह सांगितले. बाबा नागार्जुन आणि कवी मुक्तिबोध यांच्या लेखनाची चर्चा करून बिहारी अणि निरालाजी यांच्या लेखनाची उलना करून साहित्य



लेखनात वैयक्तिक संदर्भापेक्षा समुहाची वेदना, मानवता या गोष्टी कशा महत्वपूर्ण असतात त्या विषयी यथोचित मार्गदर्शन केले.

आपल्या प्रास्ताविकातून या नवलेखक शिबीराच्या आयोजनामागील भूमिका व उद्देश महाविद्यालयाच्या हिंदी विभाग प्रमुख डॉ. रमा दुधमांडे यांनी उलगडून सांगितला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वसुधा पुरोहित यांनी उपस्थितांना महाविद्यालयाच्या प्रगतीची ओळख करून देत या शिबीराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

केंद्रिय हिंदी संचालनालयाचे शिबीर प्रभारी श्री. नत्थुलाल यांनी केंद्रिय हिंदी संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देऊन या शिबिरात सहभागी झालेल्या शिबीरार्थीचे अभिनंदन केले. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सहसचिव मा.अ‍ॅड.श्री.डी.एस.कुलकर्णी यांनी या नवलेखक शिबीरासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजनाने व दीप प्रज्वलनाने झाली. सर्व मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या नवलेखक शिबीरासाठी भारताच्या वेगवेगळया प्रांतातील ५० शिबीरार्थीनी नाव नोंदणी केली असून दि.१७ ते २४ ऑगस्ट पर्यंत निरनिराळया मान्यवर वक्त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ शिबीरार्थीना होणार आहे.

या उद्‌घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिबीर समन्वयक प्रा. गजानन सर्वज्ञ यांनी केले तर आभार प्रगटन सौ. सुनेत्रा कुलकर्णी यांनी केले. या उद्‌घाटन समारंभासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# काळ्या बाजारात जाणारा शासकीय तांदूळ पकडला..!



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहर पोलीसांनी पकडलेल्या ट्रक मधील शासकीय तांदूळ निघाल्याने ट्रक चालका सह दोन जणा विरुध्द कन्नड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सोळा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की दिनांक ४ आगस्ट रोजी तालुक्यातील करंजखेड येथून तांदूळाने भरलेला ट्रक कन्नड शहरात येत असल्याची माहिती शहर पोलिसांना मिळाली . या वरून दहा ते अकरा वाजेच्या दरम्यान शहर पोलिसांचे पथक चिकलठाण फाटा येथे सापाळा रचून कन्नड कडे येणारी तांदूळाने भरलेला ट्रक क्र . एम एच २० जी ३४२० यास थांबवून चौकशी केली असता या ट्रकमध्ये सुमारे पाचशे बॅग तांदूळ आढळून आला होता. यांचे अंदाजे वजन सुमारे आडीचशे किंटल आहे. सदर ट्रक पकडलेल्या ट्रकमधील तांदूळ शासकीय असल्याचे निदर्शनात येताच दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कर्मचारी प्रविण बाबुराव चव्हाण यांच्या फिर्यादीवरून आरोपी प्रकाश नारायण दराडे एन ४ रामनगर सिडको औरंगाबाद, कलीम खा आयुब खा, करंजखेड ता. कन्नड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील ट्रकचालकाला पोलीसांनी अटक केली असून दुसरा अरोपी कलीम खा आयुब खा हा मात्र फरार असून शहर पोलिस शोध घेत आहेत .

या प्रकरणात पांच लाख सहा हजार रुपायांचा तांदूळ दहा लाख रुपये किंमतीचा ट्रक असे एकूण सोळा लाख रुपायांचा मुद्देमाल शहर पोलीसांनी जप्त केले आहे.

औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ.पवन बनसोड, कन्नड उपविभागीय पोलिस अधिकारी मुकुंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राजीव तळेकर पुढील पोलिस तपास करीत आहेत.

कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात याच प्रमाणे धान्यांची काळया बाजारात विक्री होते, महिन्याकाठी टनाने धान्याची विक्री होत आल्याची माहिती विश्वासनिय सूत्राकडून मिळत आहे, एक तर राशन दुकानात धान्य द्याला टाळटाळ करीत असतात तसेच सर्व सामान्याला मोजकाज धान्य दिला जातो, मात्र पोलिस विभाग कार्यवाही करतो तो ट्रक भरून धान्य येतो कुठून हा प्रश्न सर्वसामान्य नागरिक प्रशासनाला विचारात आहे, शहरा प्रमाणे ग्रामीण भागातही संबंधित विभागाला लक्ष्य देण्याची गरज दिसत आहे, या मुळे गरीबांना त्यांचे हक्काचे धान्य तर मिळेल अशी आशा नागरिक करीत आहे.

# डीजेऐवजी पारंपरिक बँड आदी वाद्याचा वापर करावा : हातमोडे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आगामी काळात येणाऱ्या पोळा व गणेशोत्सव सणाच्या अनुषंगाने तालुक्यातील सर्व पोलीस पाटलांची बैठक पोलीस ठाणे खुलताबाद येथे होऊन त्यात आगामी सण उत्सवाचे अनुषंगाने गावात कुठल्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी करावयाची उपाय योजना तसेच तालुक्यातील प्रत्येक गावात एक गाव एक गणपती संकल्पना राबवण्यात यावी, याविषयी पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांनी पोलीस पाटलांना सविस्तर मार्गर्शन केले. गणेशोत्सव काळात कुणीही गणपती समोर पत्ते, जुगार खेळू नये व मिरवणुकीसाठी डिजेला परवानगी नाही. त्यामुळे पारंपरिक वाद्य बँड आदी वाजवावे अशा सूचना दिल्या. गुरूवार दि.18 रोजी सकाळी 11 वाजता पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली.



यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक हातमोडे म्हणाले की, विनापरवानगी कोणीही सार्वजनिक ठिकाणी गणपती बसवू नये, गणेश मंडळांनी परवानगी काढून घावी, पोलीस पाटील यांनी सरपंच व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांनी शक्यतो आपल्या गावात एक गाव एक गणपती संकल्पना राबवावी यासाठी गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, गावात एकच गणपती बसवला तर यामुळे उत्सवाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त होऊन गावात एकोपा वाढीस लागतो तसेच एकमेकांविषयी प्रेम व जिव्हाळा निर्माण होऊन गावात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यास मदत होते. त्यासाठी सर्वांनी आपल्या गावात एक गाव एक गणपती बसवण्यासाठी प्रयत्न करावे व गणेशोत्सव शांततेत साजरा करावा. गणेशोत्सवासाठी मंडळ पदाधिकारी यांनी आवश्यक असलेल्या विविध परवानग्या आगोदर लवकर काढू घ्याव्यात, कायद्याचे चौकटीत राहून शांततेत पोळा, गणेशोत्सव साजरे करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी गोपनीय शाखा के.के. गवळी, सुहास दबिर, पोलीस पाटील संघटना तालुकाध्यक्ष जनार्दन उबाळे, उपाध्यक्षा सिंधूताई बढे, सचिव रमेश धिवरे, जिल्हा कार्यकारणी सदस्य संतोष सातदिवे, मनोहर भोसले, झनकीसिंग जंघाळ, मच्छिंद्र वाकळे, रविंद्र शिंदे, सतिष बोहरे, काचकर, शरद मालोदे, कृष्णाकांत बनकर, संतोष वेताळ, लखन राजपूत, माचावे, कारभारी नरवडे, भारत देवकर, संजय जाधव, गणेश राऊत, चंपालाल कुचे, रायभान सोनवणे, कृष्णा जाधव, राजेंद्र नाके, आजिनाथ जाथव, सय्यद अमीन, तेजराव चव्हाण, कारभारी जाधव, निसार पटेल, भगवान वाहुळ, महमद इरफान, साहेबराव घुसळे, राम शिंदे, वाल्मीक लग्गड, गंगाराम मेंगळ, बाळू काळे, सुलभा काळे, सविता वाहटुळे, छाया गडवे, योगिता वाघ यांच्यासह तालुक्यातील सर्व पोलीस पाटली मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राधा मुकुंद युगल सरकार मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** राधा मुकुंद युगल सरकार मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव सोहळ्याला प्रारंभ झाला आहे. ऐतिहासिक देवगिरी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या अब्दीमंडी येथील हा सोहळा 18 ते 20 ऑगस्ट दरम्यान सुरू राहणार आहे. या सोहळ्या निमीत्ताने सपुर्ण मंदीरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. आज, दि. 20 ऑगस्ट रोजी सकाळी अभिषेक पूजा, दर्शन, 4 वाजता नंदोत्सव व संध्याकाळी 6 वा.दहीहंडी होणार आसुन पुढे एकादशीपर्यंत झुला दर्शन आसणार आहे. तरी सर्व भाविकानी या श्रीकृष्ण



जन्माष्टमी उत्सव सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री राधामुकुंद युगल सरकार मंदिर समिती, अब्दीमंडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.


## काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## एसटीडी/एच.आय.व्ही...

आधुनिक केसरी

**एच.आय.व्ही. एड्सच्या निदानासाठी आवश्यक चाचण्या कोणत्या ?**

एच.आय.व्ही. आणि एड्सच्या निदानासाठी अ‍ॅन्टीबायोटीक्स टेस्टस्, रक्ताची तपासणी,लाळेची तपासणी, युरिनची तपासणी, वेस्टन ब्लॉट मेथड अशा चाचण्या करता येतात. अ‍ॅन्टीजन टेस्टमध्ये एच.आय.व्ही. चा व्हायरस लवकर सापडतो पण तरिही त्यासाठी १ ते ३ आठवडे लागतातच.

**एच.आय.व्ही. एड्सचा प्रसार कसा होतो?**

आता एच.आय.व्ही. एड्सचा प्रसार कसा होतो ते लक्षात घेऊ. पहिलं आणि महत्त्वाचं कारण म्हणने सेक्स, म्हणजेच यौनसंबंध, दुसरं एच.आय.व्ही. बाधित रक्त चढवल्यामुळे, दूषित नीडल्स आणि तिसरं मुख्य कारण म्हणजे एच.आय.व्ही. बाधित आईकडून बाळाला. एच.आय.व्ही. एड्स होण्याच्या समाजात अनेक भ्रामक समजूती देखील आहेत. आपण त्याही जाणून घेऊ. एक म्हणजे एच.आय.व्ही.

एड्स स्पर्श, डास, माशी, सोबत काम करणे, जेवण,कपडे, टॉयलेटचा वापर यामुळे होत नाही ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

**एच.आय.व्ही. एड्स संदर्भात कायदा काय सांगतो?**

एच.आय.व्ही. एड्सबाबत कायदा काय सांगतो ते ही खूप महत्त्वाचे आहे. कायद्यानुसार आपल्याला एच.आय.व्ही. एड्स आहे हे माहीत असताना, एखाद्या पुरुषाने बाधित नसणाऱ्या स्त्रीसोबत किंवा एखाद्या बाधित स्त्रीने बाधित नसणाऱ्या पुरुषासोबत संबंध ठेवले तर तो गंभीर गुन्हा ठरतो. कायद्यानुसार एका पार्टनरने आपल्या पार्टनरला सांगणे हे बंधनकारक आहे आणि मग त्या दोघांनी सेक्स न करणे किंवा सेफ सेक्स करणे आवश्यक आहे. **(क्रमशः)**


संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अ‍ॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com